# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०३ जुलै, २०२६ / आषाढ १२, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५८**

---

### अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारतीची जागा निश्चित करण्याबाबत

**(१) * ९२३६ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकरीता मौजे अलियाबाद येथील गट नं. ९/१ मधील प्रस्तावित जमीन ही वनविभागाच्या अखत्यारितील असल्यामुळे केंद्र शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय या जागेवर कोणतेही वनेत्तर कामे करता येणार नाहीत असे असतानाही राज्य शासनाने सदर जमीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकरीता दिनांक १४ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रस्तावित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन ही वनविभागाची असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे बांधकाम करता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनविभागाची कायदेशीर तांत्रिक अडचण आणि जनहित लक्षात घेता, अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकरीता १) स्त्री रुग्णालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालय परिसर येथे उपलब्ध असलेली २३ एकर जागा २) पंजाबराव कृषी विद्यापीठाची शहराजवळील २५ एकर जागा ३) मौजे रहाटगाव येथील सर्व्हे नं. १२१ येथील २३ एकर ई-क्लास जागा अथवा ४) कापूस पणन महासंघ (मोसीकॉल) येथील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली २५ एकर जागा यापैकी एक जागा देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती येथील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकरीता लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेकरीता प्रस्तावित करण्यात आलेली जागा वन विभागाच्या Identified Forest या प्रकारात येत असल्याचे माहे एप्रिल,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेकरीता प्रस्तावित क्षेत्रात वन (संरक्षण तथा संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदी लागू होत असल्याने केंद्र शासनाच्या पूर्व मंजूरीने सदर क्षेत्रावर बांधकाम करणे शक्य आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती साठी निश्चित करण्यात आलेल्या मौजे आलियाबाद येथील गट क्र. ९ मधील ११.२९ हेक्टर आर क्षेत्र अनारक्षित करून घेण्याकरीता परिवेश पोर्टल वर प्रस्ताव सादर करुन आवश्यक परवानगी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कामगार विमा रुग्णालयांमध्ये एक्स-रे मशिन्सच्या खरेदीत अनियमितता झाल्याबाबत

**(२) * ९३१९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.सुनिल शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगार विमा रुग्णालयांमध्ये वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने बसविण्यात आलेल्या एक्स-रे मशिनची (क्ष-किरण) खरेदी करतांना आवश्यक असणारी प्रमाणपत्रे व निर्धारित निकषांची पुर्तता न करता केलेल्या खरेदीच्या व मान्यतेच्या प्रक्रियेत अनियमितता झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कामगार विमा योजनेतंर्गत ६० रुग्णालयांमध्ये दिल्लीतील एका कंपनीकडून एक्स रे मशिन बसविण्यात आल्या असून, मशिनसाठी अणुऊर्जा नियामक संस्थेच्या विकिरण अनुप्रयोग सुरक्षा विभागाची मान्यता तसेच प्रत्येक केंद्रावर रेडिओलॉजिस्ट आणि एमबीबीएस डॉक्टरांची उपलब्धता बंधनकारक असताना काही केंद्रामध्ये कंत्राटी कर्मचारी व परिचारिकांच्या नावामागे “डॉक्टर” अशी पदवी दर्शवून ही मशिन नोंदविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या “जेम” पोर्टलऐवजी थेट कंपनीकडून खरेदी करण्यात आलेल्या “इरे स्मार्ट पाच एचएस” या एक्स रे मशिनची किंमत साधारणत ७ ते १० लाख रुपये अपेक्षित असताना प्रत्यक्षात प्रत्येकी ३९ लाख रुपये इतक्या अधिक किंमतीने सदर मशिन्सची खरेदी करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वैद्यकीय सामुग्री खरेदीत झालेल्या अनियमिततेबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीअंती दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) अंशत: खरे आहे, प्रश्नाधीन विषयाबाबतचे वृत्त दिनांक २४/०३/२०२६ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते.
(२) अंशत: खरे आहे,

महा-राकावि सोसायटी मार्फत एकूण ६० राकावियो सेवा दवाखान्यांकरीता अल्ट्रा पोर्टेबल हँडहेल्ड एक्स-रे मशिन विथ एआय सॉफ्टवेअर ही उपकरणे राज्य कामगार विमा महामंडळाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार व महा-राकावि सोसायटीच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने जेम पोर्टलद्वारे विहीत खरेदी प्रक्रिया राबवुन खरेदी करण्यात आलेली आहेत.

सदरील एक्स-रे उपकरणे उपलब्ध झाल्यानंतर उपकरणाचा तपशिल, सेवा दवाखान्यांतील डॉक्टर्स व जागेची माहिती केंद्र शासनाच्या अणुऊर्जा नियामक मंडळाच्या पोर्टलवर अपलोड करुन नोंदणी करणे आवश्यक असल्याने याबाबतची कार्यवाही महा-राकावि सोसायटी यांच्याकडुन करण्यात आली आहे.

सदर नोंदणीसाठी ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करताना सेवा दवाखाना सायन, मुंबई येथे अनावधानाने तेथील परिचारिकाचे नाव नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येऊन तेथील नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

सदरील नोंदणी प्रक्रिया झाल्यानंतर गुणवत्ता हमी चाचणी अणुऊर्जा नियामक मंडळामार्फत (AERB) पूर्ण करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत AERB कडून TLD Badge (थर्मोल्युमिनिसेंट डोसिमीटर) प्राप्त करून घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

सदर ६० सेवा दवाखान्यांमध्ये रेडिओलॉजिस्ट चे पद मंजूर नाही. तथापि, सदर सेवा दवाखान्यांमध्ये एमबीबीएस डॉक्टर्स उपलब्ध असून एक्स-रे बघण्यास सक्षम आहेत. या व्यतिरिक्त सदर मशिनमध्ये AI software सुद्धा उपलब्ध असून त्याद्वारे automatic Al generated X-ray reports प्राप्त करून घेता येतात. तसेच सदर रिपोर्ट्स संदर्भात रेडिओलॉजिस्ट चे अभिप्रायांची आवश्यकता भासल्यास सदर AI generated reports डाऊनलोड करावयाची सुद्धा सदर उपकरणामध्ये तरतूद उपलब्ध असून असे AI generated reports डाऊनलोड करून ऑनलाइनरित्या राकावि योजनेतील रेडिओलॉजिस्ट चे अभिप्राय प्राप्त करून घेता येऊ शकते. सदर एक्स-रे उपकरण हे वापरण्यास अगदी सोपे असून ट्रेनिंग दिल्यानंतर कोणत्याही समवैद्यकीय कर्मचारी यांच्या मार्फत सदर एक्स-रे उपकरणाचा वापर करता येऊ शकतो.
(३) हे खरे नाही.

जेम पोर्टल वर उपलब्ध असलेले ७ ते १० लाख रूपये किंमत असणारे “इरे स्मार्ट पाच एचएस” या एक्स-रे उपकरणामध्ये फक्त एक्स-रे उपकरण पुरविण्यात येत असून त्यामध्ये फ्लॅट पॅनल डिटेक्टर, Al software हे अतिरिक्त उपकरणे समाविष्ट नाहीत.

महा-राकावि सोसायटी सेवा दवाखान्याकरीता जेम पोर्टलमार्फत उपलब्ध करण्यात आलेल्या एक्स-रे उपकरणाची किंमत ही फ्लॅट पॅनल डिटेक्टर, AI software या अतिरिक्त उपकरणांच्या समावेशनासह तसेच ३ वर्षांची वॉरंटी, डिलिव्हरी चार्जेस, फुल सर्टिफिकेशन आहे. अल्ट्रा पोर्टेबल हँडहेल्ड

एक्स-रे मशिन विथ एआय सॉफ्टवेअर हे उपकरण खरेदी करण्याकरीता इतर शासकीय रूग्णालयांनी सदर उपकरण खरेदी करताना मान्य केलेला दर लक्षात घेऊन तांत्रिक समिती मार्फत सदर एक्स-रे उपकरणाची अंदाजित किंमत ३९ लाख इतकी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार महा-राकावि सोसायटीच्या वतीने विहीत खरेदी प्रक्रियेचा अवलंब करून सदर उपकरणाची खरेदी जेम पोर्टल द्वारे केलेली आहे.

(४) महा-राकावि सोसायटीच्या वतीने सदर एक्स-रे उपकरणांची खरेदी करताना राकावि महामंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक खरेदी प्रक्रियेचा अवलंब करुन जेम्स पोर्टल द्वारे खरेदी प्रक्रिया राबविलेली असून त्यामध्ये अनियमितता झालेली नसल्याने या प्रकरणी स्वतंत्रपणे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गुलाबी ई-रिक्षा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(३) * ९५४३ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या 'गुलाबी ई-रिक्षा' योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याचे प्रमाण कमी असून, मोठ्या शहरांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यांमध्ये सदर योजनेचा प्रत्यक्ष लाभ पोहोचण्यास प्रशिक्षणाचा अभाव, बँकांकडून कर्ज मंजुरीस लागणारा विलंब व परिवहन विभागाची परवाना प्रक्रिया क्लिष्ट असल्याने विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांकडून महिला लाभार्थ्यांना कर्ज नाकारले जात असल्याच्या किंवा अवाजवी कागदपत्रांची मागणी करून कर्ज मंजुरीस टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत तसेच इच्छुक महिलांना ई-रिक्षा चालविण्याचे तांत्रिक प्रशिक्षण आणि 'बॅज' व 'परवाना' मिळवून देण्यासाठी जिल्हा नियोजन समिती किंवा महिला व बालविकास विभागामार्फत कोणतीही सुलभ यंत्रणा कार्यान्वित नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बँकांना कर्ज वाटपाबाबत विशेष निर्देश देणे, व्याज परतावा (Interest Subvention) वेळेत जमा करणे आणि 'एक खिडकी योजना' (Single Window System) राबविण्याबाबत तसेच योजनेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आणि महिलांना सुरक्षित प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) राज्यात नोकरी तसेच रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध असलेल्या पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर व सोलापूर या ८ जिल्ह्यातील प्रमुख शहरातील सर्व भागात "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" ही योजना राबविण्यात येते आहे.

या योजनेंतर्गत गरजू महिलांना त्यांच्या सिबील स्कोअरमुळे कर्ज मिळण्यास व licence, Badge इ. मिळण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने लाभार्थी महिलांना licence, Badge सुलभरित्या मिळण्याच्या अनुषंगाने आयुक्त, परिवहन यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) सदर योजनेंतर्गत महिला लाभार्थ्यांना व्यावसायिक परवाना आणि आवश्यक तांत्रिक व सुरक्षित ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण नियुक्त पुरवठादार एजन्सीमार्फत देण्यात येते. तसेच पात्र लाभार्थी महिलांना बँकेकडून कर्ज उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने लाभार्थी महिला, क्षेत्रिय कार्यालय व संबंधित बँक यांच्यात समन्वय साधून कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तत्कालीन जिल्हा जलसंधारण अधिकारी, नागपूर यांच्यावरील शिस्तभंगविषयक कारवाईचा अहवाल सादर करण्याबाबत

**(४) * ८९८३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांच्याकडे सन २०२२ मध्ये प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना त्यांनी गडचिरोली जिल्ह्यातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या सर्वेक्षण कामाचा निधी वितरित करण्याकरीता कंत्राटदारांकडून लाच स्वीकारल्याप्रकरणी त्यांच्यावर पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर येथे क्र.अप. क्र २१२/२०२२ कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करुन त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तत्कालीन जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांच्याविरुध्द प्रस्तावित कारवाई पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली असून तिचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे, खरे आहे.

(२) शिस्तभंगविषयक प्रकरण कार्यवाहीत आहे.

(३) श्री.कविजीत सु. पाटील, तत्का. जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रभारी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये शिस्तभंगविषयक कार्यवाही अवलंबण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील अंतस्त्रावशास्त्र विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) * ९४९८ श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे अंतस्त्रावशास्त्र (Endocrinology) विभागासाठी आवश्यक इन्फ्रास्ट्रकचर अस्तित्वात असूनही पदभरती न झाल्यामुळे रुग्णसेवा व सुपर स्पेशालिटी शिक्षणावर परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागासाठी आवश्यक पदनिर्मिती व पदभरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत तसेच संधिवात (रूमेटोलॉजी) विषयात डीएम (DM) अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतची बाब लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संधिवात विषयात डीएम अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावावर अद्याप कोणतीही निर्णयात्मक कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंतस्त्रावशास्त्र (Endocrinology) विभागासाठी आवश्यक पदनिर्मिती व पदभरती प्रक्रिया पूर्ण करून तसेच संधीवात विषयात डीएम अभ्यासक्रमास मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील अंतस्त्रावशास्त्र (Endocrinology) या विभागाकरीता दिनांक २४/०४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंतस्त्रावशास्त्र (Endocrinology) विभागासाठी एक प्राध्यापक, एक सहयोगी प्राध्यापक, व दोन सहाय्यक प्राध्यापकांची पदे मंजूर करण्यात आली असून त्यानुसार या पदांवर कंत्राटी तत्त्वावर नेमणूक करण्यात आलेली असून या विभागात आवश्यक इन्फ्रास्ट्रकचर उपलब्ध असल्यामुळे तेथे रुग्णसेवा सुरु आहे.

(२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे क्लिनीकल इम्युनोलॉजी व रुमेटोलॉजी या नवीन विभागासंदर्भातील प्रस्ताव मे, २०२६ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर पदनिर्मितीकरीता आवश्यक कार्यवाही करणे शक्य होईल.

(४) अंतस्त्रावशास्त्र (Endocrinology) या विभागाकरीता दिनांक २४/०४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदनिर्मिती करण्यात आलेली आहे. एंडोक्रिनोलॉजी विषयातील एका सहायक प्राध्यापकास नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि, ते अद्याप रुजू झालेले नाहीत. तसेच, क्लिनीकल इम्युनोलॉजी व रुमेटोलॉजी या नवीन विभागासंदर्भातील प्रस्ताव मे, २०२६ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर पदनिर्मितीकरीता आवश्यक कार्यवाही करणे शक्य होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात हिमोफिलिया रुग्णांवरील उपचारांसाठी आधुनिक उपचार पध्दती उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६)** * **८६९२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हिमोफिलिया उपचारासाठी दरवर्षी सुमारे २०० कोटी रुपयांची आवश्यकता असताना त्याकरीता केवळ ४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असल्यामुळे रुग्णांना आवश्यक उपचार मिळण्यात अडचणी येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका व जिल्हा रुग्णालयांमध्ये तज्ज्ञ हिमॅटॉलॉजिस्ट, स्वतंत्र निधी व क्लॉटिंग फॅक्टर औषधांचा पुरवठा अपुरा असल्याने रुग्णांची गैरसोय होत असून, के.ई.एम. रुग्णालयासारख्या काही मोजक्या केंद्रांवरच तृतीयस्तरीय उपचार उपलब्ध असल्याने राज्यातील इतर भागातील महानगरपालिका रुग्णालयातील रुग्णांना उपचारासाठी अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२२ पासून पुनर्संयोजक घटक व आधुनिक उपचार पध्दती (उदा. EHL Factor) उपलब्ध नसून हिमोफिलिया उपचारासाठी पुरेसा व स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करुन सर्व जिल्हा व महानगरपालिका रुग्णालयांत आवश्यक तज्ज्ञ व औषधांची उपलब्धता करणे, रक्त गोठण्यास मदत करणाऱ्या औषधांचा नियमित पुरवठा सुनिश्चित करणे, आधुनिक उपचार पध्दती तातडीने उपलब्ध करून देणे इत्यादी बाबींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही,

सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये राज्य रक्त कक्षाने केंद्र शासनाकडे अंमलबजावणी आराखड्यात एकूण (PIP) मध्ये ५५०० हिमोफिलिया रुग्णांच्या उपचाराकरीता रुपये १८२११.५२ लक्ष अनुदानाची मागणी औषधे खरेदी करण्यासाठी करण्यात आली होती. सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाच्या मंजूर PIP नुसार रुपये ९१०५.७६ लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले होते. तसेच Prioritization नुसार २०२४-२५ मध्ये रुपये २२५५.५८ लक्ष व सन २०२५-२६ मध्ये ५०५०.३२ लक्ष अनुदान मंजूर झाले व त्यामधुन रुपये ४०००.०० लक्ष अनुदान उपलब्ध होऊन त्या अनुदानातून फॅक्टरर्सची खरेदी होऊन फॅक्टरर्स हिमोफिलीया रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे,

राज्यात उपलब्ध असलेल्या हिमॅटॉलॉजिस्ट यांचे मार्गदर्शन हिमोफिलिया रुग्णांच्या उपचारासाठी घेण्यात येते. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व हिमोफिलिया डे-केअर सेंटर मध्ये फॅक्टर्सचा पुरेसा पुरवठा करण्यात आलेला असून सद्य:स्थितीत सर्व डे-केअर सेंटर मध्ये फॅक्टर्स उपलब्ध आहेत.

(३) हिमोफिलिया आजाराच्या अनुषंगाने विविध उपाययोजना सुचविण्यासाठी मा.मंत्री (सा.आ. व कु.क.) यांच्या निर्देशानुसार दिनांक १८/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये तज्ञांचा समावेश असलेली राज्यस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.

सदर समिती हिमोफिलिया रुग्णांच्या उपचारासाठी आधुनिक उपचार पध्दती, आवश्यक निधीची तरतूद, औषधोपचार यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करण्याचे काम करणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य महिला आयोगाकडील प्रलंबित प्रकरणांचे निवारण करण्याबाबत

**(७) * ८६९१ श्री.पंकज भुजबळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संजय खोडके, श्री.इद्रिस नायकवडी, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०२५ ते फेब्रुवारी, २०२६ या दहा महिन्यांच्या कालावधीत महिला अत्याचाराच्या १६,६०८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २,७७७ तक्रारी अजूनही प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षांच्या कार्यकाळात तक्रारींचे प्रमाण झपाट्याने वाढले असून याच कालावधीत राज्यात बलात्काराच्या ४,४९७ घटनांची नोंद झाल्याचे व ४८ तासांत किंवा विहित मुदतीत न्याय न मिळाल्याने ७३३ तक्रारी अद्यापही निकाली निघाल्या नसून प्रशासकीय दिरंगाईमुळे पीडित महिलांना न्याय मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या १७६ तक्रारी दाखल झाल्या असून, अमरावती आणि नाशिक यांसारख्या शहरांतील गंभीर प्रकरणांमुळे महानगरांमध्ये कामाच्या ठिकाणी महिला असुरक्षित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महिलांवरील अत्याचारांची वाढती प्रलंबित प्रकरणांचे निवारण करण्यासाठी तसेच राज्य महिला आयोगाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी कोणती उपाययोजना केली तसेच आरोपींना कठोर शिक्षा होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे दिनांक १ एप्रिल, २०२५ ते फेब्रुवारी, २०२६ या दहा महिन्यांच्या कालावधीत महिला अत्याचाराच्या १६६०८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २७७७ तक्रारींवरील अंतिम अहवाल प्राप्त न झाल्याने कार्यवाहीस्तव आहेत.
(२) हे खरे नाही.

महिला आयोगाच्या विविध उपक्रमांमुळे महिलांमध्ये अन्यायाविरुध्द दाद मागण्याची जाणीव निर्माण झाल्याने महिलांच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे.

तसेच, प्रश्नात नमूद ४४९७ ही संख्या फक्त बलात्काराच्या तक्रारींच्या नोंदी नसून सामाजिक समस्या या वर्गीकरणातील आहेत. त्यामध्ये बालविवाह, हुंडा प्रथा, लैंगिक असमानता, जातीभेद, बलात्कार, सायबर गुन्हे, लिंगाधारित हिंसाचार, अंधश्रध्दा इत्यादी तक्रारींचा समावेश होतो. या वर्गीकरणातील तक्रारींपैकी ३७६४ तक्रारींवर कार्यवाही पूर्ण झाली आहे व ७३३ तक्रारींवर अंतिम अहवाल प्राप्त न झाल्याने कार्यवाहीस्तव आहेत. सद्य:स्थितीत माहे एप्रिल, २०२६ अखेर पर्यंत सामाजिक समस्यांच्या ६०७ तक्रारींवर कार्यवाही सुरु आहे.

(३) महिला आयोगाकडे कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या १७६ तक्रारी दाखल झाल्या असून, १२८ तक्रारींवर कार्यवाही पूर्ण झाली आहे व ४८ तक्रारींवर अंतिम अहवाल प्राप्त न झाल्याने कार्यवाहीस्तव आहेत.सद्य:स्थितीत माहे एप्रिल, २०२६ अखेर कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या ३१ तक्रारींवर कार्यवाही सुरु आहे.

(४) महिला व बालविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांचा सुधारित आकृतीबंधास दिनांक १०/०४/२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. आयोगातील वाढता कामाचा व्याप लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या विभागीय कार्यालयांकरीता आवश्यक असणाऱ्या पदांचा समावेश सदर आकृतीबंधात करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंहगड दंत महाविद्यालय व रुग्णालय, पुणे तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथील विद्यार्थ्यांचे स्थलांतरण झाल्याने नुकसान होत असल्याबाबत

**(८) * ९५०१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड दंत महाविद्यालयाचे प्रकरण न्यायालयात दाखल असताना नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने त्यांच्या विद्यार्थ्यांना राज्यातील अन्य महाविद्यालयांत स्थलांतरित केल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने दंतचिकित्सकाच्या विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठासमोर आंदोलन केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहगडच्या दंत महाविद्यालयामध्ये सध्या ५०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून शैक्षणिक व क्लिनिकल कामकाज सुरळीत सुरू असल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला आहे, मात्र विद्यापीठातील काही अंतर्गत बाबीमुळे विद्यार्थ्यांचे स्थलांतरण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने दिनांक १३/०४/२०२६ रोजी या महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे सोबत एकत्रित पणे परंतु वैयक्तिक प्रश्नावर चर्चा केली व त्यांच्या शंकांचे निरसन केले.

(२) व (३) सिंहगड दंत महाविद्यालय व रुग्णालय, पुणे हे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पुढील आदेशापावेतो, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी असंलग्नीत केलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता सदर महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर पदवी व आंतरवासिता विद्यार्थी यांना राज्यातील इतर २४ खाजगी विनाअनुदानित दंत महाविद्यालयांमध्ये स्थानांतरीत करण्यास दिनांक १२/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १५४३४/२०२६ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २२/०५/२०२६ रोजी पारित केलेले आदेश विचारात घेऊन सिंहगड दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, पुणे या महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर पदवी व आंतरवासिता विद्यार्थ्यांचे राज्यातील इतर खाजगी विनाअनुदानित दंत महाविद्यालयांमध्ये स्थानांतरण करण्याबाबतचा दिनांक १२/०३/२०२६ रोजीचा शासन निर्णय दिनांक १६/०६/२०२६ रोजी अधिक्रमित करण्यात आला आहे. त्यानुसार सिंहगड दंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता स्थानांतरणाची प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे थकीत मानधन अदा करण्याबाबत

**(९) * ८७२९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके, श्री.पंकज भुजबळ, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत १ लाखांहून अधिक अंगणवाडी सेविका कार्यरत असून, सध्या अंगणवाडी सेविकांना १३ हजार रुपये तर मदतनीसांना ७५०० रुपये इतके मानधन शासनाकडून दिले जात असून या मानधनापैकी केंद्र शासनाचा हिस्सा अनुक्रमे रुपये ४५०० व रुपये ३५०० इतका असून उर्वरित मानधन राज्य शासनाकडून दिले असल्याचे तसेच मागील चार महिन्यांपासून केंद्र शासनाचा निधीच प्राप्त झाला नसल्याने अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे मानधन अदा केले जात नसल्याची बाब दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील सुमारे ७,८०० अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांचे गेल्या दोन महिन्यांपासूनचे मानधन प्रलंबित असल्याची बाब दिनांक ११ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना अद्याप मानधन न मिळाल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असून, थकीत मानधन तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरित करण्यासाठी SNA SPARSH या कार्यपध्दतीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिलेले आहेत. त्यानुसार एकात्मिक बालविकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने सदर योजनेमध्ये SNA SPARSH कार्यपध्दतीद्वारे अंमलबजावणी करणेबाबत अनिवार्य करण्यात आले आहे. सुरूवातीच्या कालावधीत SNA SPARSH ची कार्यपध्दती पूर्णतः नविन असल्याने तसेच विविध तांत्रिक अडचणीं आल्याने एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना केंद्र हिस्सा व त्यास समरूप राज्य हिश्याचे मानधन अदा करणे प्रलंबित राहिले होते. तथापि, तदनंतरच्या कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करून अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे माहे डिसेंबर २०२५ ते माहे मे, २०२६ पर्यंतचे सदर केंद्र हिस्सा व त्यास समरूप राज्य हिश्याचे मानधन अदा करण्यात आले आहे.

केंद्र शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो.

तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना अतिरिक्त राज्य हिश्यामधून देय असलेले मानधन नियमीतपणे अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडून शासकीय कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यास दिरंगाई होत असल्याबाबत

**(१०) * ९६१९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी आणि जुने रेकॉर्ड तपासण्याचे स्पष्ट आदेश अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी देऊनही जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये अथवा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक व्यक्तींनी जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष तपासणीसाठी उपस्थित न राहता, शासकीय पोर्टलवरून 'युडीआयडी' [Unique Disability ID (UDID)] क्रमांकाद्वारे परस्पर दिव्यांग प्रमाणपत्रे मिळविले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुतांश लाभार्थ्यांचे मूळ रेकॉर्ड जिल्हा रुग्णालयात उपलब्ध नसून, सदर बनावट प्रमाणपत्र गैरव्यवहारप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन दीड वर्षाचा कालावधी होऊनही तांत्रिक माहितीअभावी अद्याप तपासात कोणतीही प्रगती झालेली नसल्याचे तसेच, जिल्हा परिषदेने पडताळणीसाठी पाठविलेल्या संशयास्पद दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या यादीबाबत जिल्हा रुग्णालय प्रशासन माहिती लपवून दोषींना पाठीशी घालत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने विशेष तपास पथकाद्वारे चौकशी केली आहे काय, चौकशीअंती बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरी मिळविणाऱ्या व्यक्तींचे प्रमाणपत्र रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत, तसेच सदर गैरव्यवहारात सहभागी असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय दिनांक ०९/१०/२०२५ अन्वये जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शासकीय कर्मचारी यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र पडताळणी/तपासणी करण्याचे दिनांक ०२/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये आदेश दिलेले आहेत. त्यानुषंगाने या आरोग्य संस्थेकडून संबंधित शासकीय कार्यालयाकडून संदर्भीत केलेले सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रमाणपत्र संबंधित जुने रेकॉर्डची पडताळणी व दिव्यांत्वाची तपासणी करुन अहवाल वेळोवेळी सादर करण्यात आलेले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिव्यांग प्रमाणपत्र वितरण प्रणालीचा (UDID) लॉगीन आयडी पासवर्ड चोरीस गेल्याप्रकरणी ०६ संशयित आरोपी विरोधात गु.र. न. ९८९/२०२४ अन्वये तोफखाना पोलीस स्टेशन, अहिल्यानगर येथे दिनांक ०९/०९/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदरील गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा यांच्या मार्फत चालू आहे.

(३) हे खरे नाही.

या आरोग्य संस्थेकडे दिव्यांग वैद्यकीय मंडळामार्फत निर्गमित केलेले सर्व दिव्यांग प्रमाणपत्र संबंधित मूळ रेकॉर्ड, नस्ती/दफ्तर रुग्णालयीन प्रशासनाकडे उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषद अहिल्यानगर या कार्यालयाकडून संदर्भित केलेले एकूण ४१७ शासकीय कर्मचाऱ्यांची पुर्नपडताळणी/पुर्नतपासणी करण्यात आली तसेच एकूण १६ संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्र धारक अपात्र असले बाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांना सादर करण्यात आलेला आहे.

(४) सदर प्रकरणी गु.र.नं. ९८९/२०२४ अन्वये पोलीस चौकशी चालू आहे तसेच असलेल्या एका कंत्राटी कर्मचारी यास बडतर्फ करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रामटेक व पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यांतील धरणांमध्ये अपूरा जलसाठा असल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(११)** * **८६९९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक व पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यातील कामठी खैरी, तोतलाडोह, खिंडसी, नांद व वडगांव धरणांमध्ये गेल्या वर्षी सरासरी ११५० मि.मी. पाऊस होऊनही अपूरा जलसाठा असल्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे, एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागामध्ये माहे ऑक्टोबर ते ३० जून या नऊ महिन्यांच्या |(३ टप्प्यात) कालावधीत तीव्र पाणी टंचाई निर्माण होत असल्याने ११७० गावांचे पाणी टंचाईचे प्रस्ताव सादर झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पाणीटंचाई दूर करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या असून उक्त योजना पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित केला नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी तसेच तातडीने उक्त गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

रामटेक तालुक्यातील एकूण १४५ गावांपैकी ३७ गावांमध्ये तसेच पारशिवनी तालुक्यातील एकूण १०५ गावांपैकी ५४ गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यासाठी ३७ गावांमध्ये एकूण ७४ उपाययोजनांचा (रक्कम रुपये २७७.३० लक्ष) व पारशिवनी तालुक्यासाठी ५४ गावांमध्ये एकूण १०८ उपाययोजनांचा (रक्कम रुपये ६१४.१० लक्ष) आराखडा मंजूर करणेत आलेला आहे.

(३) संबंधित गावांना आवश्यकतेनुसार पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. पाणी टंचाई निवारणासाठी विहीर अधिग्रहण, टँकरद्वारे पाणीपुरवठा, नळयोजना दुरुस्ती, स्रोत बळकटीकरण, तात्पुरत्या पूरक नळयोजना, सार्वजनिक विहीर खोलीकरण, विंधन विहीर दुरुस्ती इ. आवश्यक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. टंचाई अंतर्गत उपाययोजना ३० जून पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

तसेच जल जीवन मिशन व इतर योजनेंतर्गत दीर्घकालीन उपाययोजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोनसई (ता.वाडा, जि.पालघर) येथील फटाका निर्मिती करणाऱ्या कारखान्यात स्फोट होऊन जखमी व मृत्यूमुखी कामगारांच्या वारसदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१२) * ८७३९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोनसई (ता.वाडा, जि.पालघर) येथे एका फार्म हाऊसमध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या फटाका निर्मिती उद्योगात स्फोट होऊन दोन कामगारांचा मृत्यू व सहा महिला कामगार गंभीर जखमी झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फटाका कारखाना मागील पाच महिन्यांपासून कोणत्याही शासकीय परवानगीशिवाय सुरू असून, औद्योगिक झोन असलेल्या वाडा तालुक्यात अशाप्रकारे छुप्या पध्दतीने ‘पोल्ट्री फार्म’च्या नावाखाली बेकायदेशीर फटाके बनविण्याचे उद्योग सुरू असताना स्थानिक पोलीस प्रशासन व महसूल यंत्रणेचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या कारखाना मालकांवर व व्यवस्थापनावर कारवाई करण्याकरीता स्थानिक पोलिसांकडून टाळाटाळ होत असून या स्फोटात मृत्यू झालेल्या कामगारांच्या वारसदारांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी तालुक्यात सुरू असलेल्या अन्य संशयास्पद उद्योगांची तपासणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडुन परवाना न घेता कोनसई (ता.वाडा, जि.पालघर) येथील अनधिकृतपणे सुरु असलेल्या फटाका निर्मिती करणाऱ्या कारखान्यात माहे एप्रिल, २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात स्फोट होऊन दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला व पाच महिला कामगार जखमी झाल्या होत्या.

सदरचा फटाके बनवण्याचा कारखाना निर्जनस्थळी सुरु असल्यामुळे प्रशासनाच्या निदर्शनास आला नाही.

(३) पोलीस प्रशासनाकडुन एकूण सहा आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ सह स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८ अंतर्गत दिनांक २१/०४/२०२६ रोजी वाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. सद्य स्थितीत तीन आरोपी अटकेत असून तीन आरोपी यांना जामीन प्राप्त झाला आहे.

सदर फटाके बनविण्याचा कारखाना व्यवसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० अंतर्गत परवाना न घेता सुरु होता.दिनांक २०/०४/२०२६ रोजी सदर कारखान्यामध्ये झालेल्या स्फोटाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर कारखान्याच्या मालकावर महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ४(४) नुसार तसेच व्यवसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० चे कलम ६(२)(अ) अंतर्गत भंग आढळुन आला आहे. सदर भंगासाठी कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई येथे खटला दाखल करण्यात आला आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर कारखाना बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

सदर घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाईसाठी श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.

तालुक्यात सुरू असलेल्या अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करण्यासाठी महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि इतर शासकीय यंत्रणांच्या समन्वयाने तपासणी मोहीम सुरू आहे. याद्वारे विनापरवाना कारखान्यांना भेटी देऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे, तसेच त्यांना कायदेशीररीत्या नोंदणीकृत करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथे स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**(१३)** * **८९२२ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन चार स्वतंत्र कर्करोग रुग्णालये उभारण्याचे नियोजन असून पुणे येथे स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत विचार करण्यात येईल असे सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी जाहीर केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून पुणे येथे स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभे राहावे यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग अशा दोन्ही स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाचे पुण्यात कर्करोग रुग्णालय व्हावे म्हणून सन २०१३ पासून प्रयत्न सुरु असून निधीची कमतरता आणि जागेअभावी हा प्रस्ताव प्रलंबित असून याबाबत ससून रुग्णालय प्रशासनाने राज्य शासनाला प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औंध जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात सार्वजनिक आरोग्य विभागाची ६० ते ७० एकर जागा उपलब्ध असून या ठिकाणी रुग्णालय उभारणीचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्करोग रुग्णांना स्वस्त दरात दर्जेदार व सर्व आवश्यक उपचार मिळण्यासाठी पुणे येथे कर्करोग रुग्णालय सुरू करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

औंध जिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये एकूण ८४ एकर जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी रुग्णालय उभारणीबाबत लोकप्रतिनिधींची मागणी आहे.

(४) कर्करोगबाधित रुग्णांना गंभिर व दुर्धर आजारातून बरे होण्याच्या दृष्टीने कर्करोग रुग्णालय स्वतंत्र अथवा अन्य रुग्णालयात कर्करोगासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गतची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत

**(१४) * ९०९७ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ‘जलजीवन मिशन’ योजनेच्या कामांना होणाऱ्या विलंबाबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास ठेकेदारांना ‘कारणे दाखवा’ नोटीस बजाविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठिकाणची कामे ७५ टक्क्यांपेक्षा जास्त कामे पूर्ण झालेली आहेत, ती कामे प्राधान्याने पूर्ण करून शाळा, अंगणवाडी, ग्रामीण रुग्णालय येथे तातडीने नळजोडणी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात १,२४४ गावांसाठी १,१६४ योजना मंजूर असून, सदर योजनांची भौतिक प्रगती ६०.३१ टक्के आहे आणि सदर योजनेतंर्गत कामे पूर्ण करण्यासाठी रुपये ४२०.३१ कोटी इतक्या अतिरिक्त निधीची आवश्यकता असून सदर निधी तात्काळ उपलब्ध करून देऊन सर्व योजना विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल २०२६ च्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या बैठकीमधील जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या सुचनांनुसार जल जीवन मिशन योजनेच्या कामासाठी विलंब करणाऱ्या ३०८ कंत्राटदारांना जिल्हा परिषदेमार्फत नोटीस बजावण्यात आली आली आहे.

(२) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमार्फ़त एकूण २०९ कामे ७५ टक्केच्या भौतिक प्रगतीपर्यंत पूर्ण झाली असून सदर कामांना पर्याप्त निधी प्राप्त झाल्यास माहे डिसेंबर २०२६ पर्यंत यापैकी १५३ योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे. उर्वरित ५६ कामे सुधारीत होणार असून सदर कामे माहे मार्च २०२७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच, जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व शाळा व अंगणवाड्यांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(३) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये एकूण १२४४ गावांकरीता जिल्हा परिषदेमार्फ़त एकूण ११६४ योजना मंजूर असून त्यापैकी ७११ योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत. जल जीवन मिशनअंतर्गत घेण्यात आलेल्या योजनांकरीता रुपये ४२०.३१ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. निधी वितरणाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक बाबींची पुर्तता करुन घेण्याबाबत क्षेत्रिय यंत्रणांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु असून कार्यपुर्तता होताच निधी उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील अंगणवाडी पूरक पोषण आहार योजनेंतर्गत झालेल्या अर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१५) * ९४६६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात महिला व बालकल्याण विभागामार्फत देण्यात येत असलेल्या अंगणवाडी पूरक पोषण आहाराच्या निधीमध्ये येथील अधिकारी व कर्मचारी यांनी १२ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याची बाब दिनांक ६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती प्रशासकीय किंवा कायदेशीर कारवाई केली तसेच अपहार केलेली रक्कम वसूल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) नंदुरबार जिल्ह्यामध्ये माहे जानेवारी, २०२६ च्या सुमारास सदर घटना घडलेली आहे. अंगणवाडी केंद्रातील बालकांना पूरक पोषण आहार पुरवण्याच्या नावाखाली, बचत गटांच्या नावे बनावट देयके तयार करून आणि अनधिकृत वेंडर नोंदणी (Vendor Registration) करून संबंधित कनिष्ठ सहाय्यक यांनी रुपये १२,०५,६५६/- इतक्या रकमेचा अपहार केल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०१/२०२६ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार, बालविकास प्रकल्प कार्यालय रनाळा (जि.नंदुरबार) येथील कनिष्ठ सहाय्यक आणि बालविकास विभाग (नंदुरबार) येथील कनिष्ठ सहाय्यक या दोन्ही कर्मचाऱ्यांनी यापेक्षा अधिक शासकीय निधीचा अपहार केल्याचे दिसून आले आहे. अपहार झालेल्या रकमेपैकी काही रक्कम वसूल करून शासन खाती जमा करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी संबंधित दोन्ही कर्मचाऱ्यांना तातडीने जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच, त्यांचे विरुध्द नंदुरबार शहर पोलीस स्टेशन येथे प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करून गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आवश्यक औषधे रुग्णालयातून उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) * ९५३५ श्रीमती भावना गवळी, श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयातंर्गत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आवश्यक औषधे रुग्णालयातून उपलब्ध न करून देता बाहेरून खरेदी करण्यास सांगितले जात असल्याच्या तक्रारी माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी रुग्णालयात येणाऱ्या सर्व रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असलेली औषधे रुग्णालयातील औषध साठ्यातूनच उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत व औषधांचा तुटवडा टाळण्यासाठी औषध साठ्यांची नियमित तपासणीच्या सूचनाही दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्तांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन होते की नाही याची पडताळणी करण्यासाठी वेळोवेळी निरीक्षण व अहवाल सादर करण्याची जबाबदारी ही वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षक यांच्यावर सोपविण्यात आली असून त्यानुषंगाने अधिष्ठाता व वैद्यकीय अधीक्षक यांच्याकडून निरीक्षण व अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयात येणाऱ्या सर्व रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असलेली औषधे रुग्णालयातील औषध साठ्यातूनच उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगणारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) संचालनालयाच्या परिपत्रकानुसार संस्थास्तरावर दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष संचालनालय यांच्या स्तरावरून सदर बाबीचा नियमित आढावा घेण्यात येत आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## वलप (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये तयार केलेल्या बनावट जन्म नोंदणी दाखल्यांप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * ९३६६ श्री.विक्रांत पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वलप (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ग्रामपंचायतीमधील ग्रामसेविकेच्या अधिकृत युजर आयडी आणि पासवर्डचा वापर करून एका अनोळखी व्यक्तींनी २ हजार ६६० बनावट जन्म नोंदणी दाखले तयार केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बनावट जन्म नोंदणी दाखल्यांचा तपास करण्यात आला आहे काय, सदर तपासात काय निष्पन्न झाले आहे तसेच सदर प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) वलप (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या नागरी नोंदणी प्रणाली (CRS) वरील Add Old Event या पर्यायाचा अवलंब करून डिजिटाइज्ड करण्यात आलेल्या जुन्या जन्म नोंदींची समीक्षा करतेवेळी २६६० जन्म नोंदी या बनावट असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले.

बनावट जन्म नोंदी रद्द करण्याबाबतची कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली. तसेच नवीन पनवेल, नवी मुंबई पोलीस ठाणे येथे प्रथम खबर अहवाल (FIR) रजि.क्र. ५१/२०२६ नोंदविला आहे. त्यानुषंगाने ०३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक, पनवेल तालुका पोलीस ठाणे, नवी मुंबई यांचेमार्फत पुढील तपास व कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत कामगार लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१८) * ९२२२ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.पंकज भुजबळ, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळातील कामगारांना दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास लोकसेवा हक्क हमी कायदा शासनाने लागू केला असून मंडळाच्या अनागोंदी कारभारामुळे राज्यातील २० लाखांहून अधिक नोंदणीकृत कामगारांचे लाभ आणि अर्ज अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करावी अशी कामगारांची मागणी असून उक्त कामागारांनी दिनांक १६ मार्च, २०२६ पासून मुंबईच्या आझाद मैदानात मोर्चा काढून बेमुदत उपोषण केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कायदा लागू करुनही कामगारांना लाभ देण्यात दिरंगाई करणाऱ्या सबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली तसेच नोंदणीकृत कामगारांचे लाभ देऊन त्यांचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अतंर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप योजनेबाबतच्या २३ लोकसेवा, त्यांची नियत कालमर्यादा आणि पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी यांना शासनाच्या दिनांक ०४/०९/२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आले आहे.

मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण आणि विविध कल्याणकारी योजनेच्या लाभ वाटपाची कार्यवाही मंडळाच्या एकात्मिक कल्याणकारी मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS) या संगणकीय प्रणालीमार्फत करण्यात येते. सद्य:स्थितीत मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या वाढत्या नोंदणीसाठी, कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना नोंदणी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देऊन कामकाज चालविले जाते. त्यामुळे कामकाजाचा आवाका पाहता, काही प्रमाणात अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाबीच्या अनुषंगाने शासनस्तरावर मंडळासाठी सुधारित आकृतिबंध मंजूर करणे प्रस्तावित आहे.

(३) प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी विधानसभा क्षेत्रिय निहाय स्थानिक विधानसभा सदस्यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक संनियंत्रण समिती गठीत करण्यात आल्या आहेत. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.७५०/२०२६ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक ३०/०४/२०२६ रोजी दिलेल्या आदेशात वरील शासन निर्णयाला स्थगिती दिली असून प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने पुन्हा प्रचलित पध्दतीने नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत अर्ज निकाली काढण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा (जि.पुणे) येथील व्यवस्थापनाची चौकशी करुन कारवाई करणेबाबत

**(१९) * ९०२१ श्री.अमित गोरखे, श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील स्वच्छता कंत्राट असलेल्या लोकराज्य स्वयंरोजगार सहकारी सोसायटीचे सुमारे २७५ कोटी रुपये रुग्णालय प्रशासनाने प्रलंबित ठेवल्याने ठेकेदाराने दिनांक १ एप्रिल पासून काम बंद केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे येरवडा मनोरुग्णालयात अस्वच्छता, घाण आणि दुर्गंधीचे पसरली असून येथील कर्मचाऱ्यांकडून मनोरुग्णांचा छळ केला जात असून त्यांना उपचाराऐवजी स्वच्छता, जेवण आणि कपडे वाहून नेण्याची कामे करण्यास भाग पाडले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य उपसंचालक, पुणे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर रुग्णालयातील अनागोंदी कारभार आणि रुग्णांची होणारी छळवणूक समोर आल्याने याप्रकरणी सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाईची मागणी त्यांनी मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्याकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीअंती दोषींवर कारवाई करण्याकरीता तसेच कंत्राटदारास देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथे कंत्राटी स्वच्छता सेवा पुरविणारे सेवा पुरवठादार मे.लोकराज्य स्वयंरोजगार सेवा संस्था पुणे यांनी त्यांचे रुपये २.८२ कोटी इतक्या रकमेची देयके प्रलंबित असल्याने एप्रिल २०२६ पासून कामबंद करीत असल्याबाबत त्यांच्या दिनांक २५/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. सदर संस्थेच्या करारनाम्याची मुदतवाढ दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपुष्टात आल्याने सदरील संस्थेकडील कंत्राटी स्वच्छता सेवा आपोआप संपुष्टात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) दिनांक ०६/०४/२०२६ रोजी दैनिक लोकमत व दैनिक पुढारी या वर्तमानपत्रामध्ये प्रादेशिक मनोरुग्णालयातील कारभार रामभरोसे या मथळयाखाली रुग्णालयातील एक रुग्ण जेवण पुरवविणारी हातगाडी धरुन उभा राहिलेला फोटोसह बातमी प्रसिध्द झाली होती. त्याअनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांच्या निर्देशानुसार रुग्णालय स्तरावरुन सदरील प्रकरणी चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात येऊन चौकशी करण्यात आली आहे. चौकशी समितीने दिलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. या व्यतीरिक्त रुग्णालयातील अनागोंदी कारभार व रुग्णांची होणारी छळवणूक असे प्रकार उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ पुणे यांचे प्रत्यक्ष पाहणीत समोर आलेले नसल्याचे नमुद केले आहे.

मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, पुणे यांनी दाखल केलेल्या रुपये २,८२,१५,५२०/- रूपयांच्या देयकापैकी त्यांना देय होणारी रक्कम रुपये ९३,८१,६६८/-संबंधित संस्थेस अदा करण्यात आली आहे.

तसेच कंत्राटी स्वच्छता सेवा व इतर सेवेविषयी शासन आदेश दिनांक १७/०२/२०२६ अन्वये सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली शासनाने चौकशी केलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुसळवाडी (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२०) * ९३३२ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुसळवाडी (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) सह ९ गावांची पाणीपुरवठा योजना गत दोन वर्षांपासून बंद असल्याची तसेच प्रवरा व मुळा नदीवरील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे कोरडे पडल्यामुळे राहुरी व श्रीरामपूर तालुक्यातील नदीकाठच्या गावांमध्ये तीव्र पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित गावांमध्ये दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणावर होत असून पाण्याअभावी जनावरांच्या संगोपनावर परिणाम होऊन दुग्ध उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावातील पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी तसेच पाणीटंचाई निवारणासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

वर्धित वेग कार्यक्रमांतर्गत मुसळवाडी (ता.राहुरी, जि.अहिल्यानगर) सह ९ गावांची पाणीपुरवठा योजना सन १९९८ ते २००३ या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात आली होती. सदर योजना दिनांक ०१/०९/२००३ रोजी जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांस पुढील देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आली. तद्नंतर सदर योजना लाभार्थी गावाच्या संयुक्त पाणीपुरवठा समितीकडून चालविण्यात येत होती. परंतु महावितरण कंपनीचे विद्युत देयकाची व जलसंपदा खात्याचे अशुध्द पाण्याची देयकाची थकबाकी समितीने न भरल्याने सदर विभागाकडून विद्युत पुरवठा व पाणीपुरवठा बंद केल्याने सन २०२१ पासून योजना बंद आहे.

श्रीरामपूर व राहूरी या तालुक्यात प्रवरा व मुळा या नदीवर कोल्हापूर पध्दतीची कोणतीही पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्याकडून राबविण्यात आलेली नाही.

राहूरी व श्रीरामपूर ही गावे प्रवरा व मुळा नदी लगत असल्याने स्थानिक उद्भवास पाणी उपलब्ध असून ग्रामपंचायतीकडून पाण्याच्या टंचाईबाबत कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.

मुसळवाडी (ता.राहूरी, जि.अहिल्यानगर) व परिसरातील गावांमध्ये पाण्याअभावी जनावरांच्या संगोपनावर परिणाम होऊन दुध उत्पादक शेतकरी अडचणीत आल्याची बाब निर्दशनास आलेली नाही.
(३) जल जीवन मिशन रेट्रोफिटींग अंतर्गत मुसळवाडी टेल टँक उद्भवावरून मुसळवाडी व ९ गावांसाठी योजना मंजूर असून सदर योजनेचे ७६ % कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच कंत्राटदाराने कामाची गती न राखल्याने प्रतिदिन रुपये १६८३ अशी दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली असून सदर योजना जल जीवन मिशन रेट्रोफिटींग अंतर्गत कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरगाव व कात्रप (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील नवीन जलकुंभांच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची चौकशी करण्याबाबत

**(२१) * ९६९० श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव-बदलापूर शहरातील पाणीपुरवठा योजनेतंर्गत शिरगाव परिसरातील गाडगे चौक नाक्यावर आणि कात्रप परिसरात बांधण्यात आलेल्या नवीन जलकुंभांचे (पाण्याच्या टाक्या) लोकार्पण माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गाडगे चौक नाक्याजवळील जलकुंभाचे उद्घाटन झाल्यानंतर काही दिवसांतच त्या टाकीला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने, ती कार्यान्वित केल्यानंतरही तातडीने पाणीपुरवठा बंद करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कात्रप परिसरातील नवीन जलकुंभालाही अशाच प्रकारे गळती असून, कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या या नवीन टाक्यांतून पाणी साठवण्याऐवजी लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे मार्च महिन्यात उद्घाटन करूनही केवळ निकृष्ट बांधकामामुळे या दोन्ही परिसरातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असून, या निकृष्ट कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून दोषी कंत्राटदारास 'काळ्या यादीत' समाविष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या दोन्ही टाक्यांची दुरुस्ती करून त्या पूर्ण क्षमतेने सुरु करण्यासाठी तसेच सदर प्रकरणी नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) जलकुंभाच्या जलदाब चाचणी दरम्यान गळती आढळून आली होती. कंत्राटदाराकडून गळती दुरुस्ती करून घेण्यात आलेली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

परंतु, जलकुंभाची गळती कंत्राटदाराकडून काढण्यात आली असून, पाणीपुरवठा चालू आहे. गळतीमुळे लाखो लिटर्स पाणी वाया जात आहे, हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.

तथापि, सदर जलकुंभ बांधकामाचे २ महिन्यांत स्ट्रक्चरल ऑडिट (Structural Audit) करण्याचे नियोजित आहे. स्ट्रक्चरल ऑडिट (Structural Audit) अहवालात दोषी आढळून आल्यास नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.
(५) कात्रप येथील जलकुंभाची दुरुस्ती करुन जलकुंभातून पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. तसेच पनवेलकर इस्टेट (गाडगे चौक) येथील जलकुंभाचे दुरुस्तीचे काम कंत्राटदाराकडून पूर्ण करण्यात आले असून, जलदाब चाचणी घेतल्यानंतर जलकुंभातून लवकरच पाणीपुरवठा सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यात विशेषत: नांदेड जिल्ह्यामध्ये अशुध्द पाण्याची विक्री करणाऱ्या वॉटर फिल्टर प्लांटची तपासणी करण्याबाबत

**(२२)** * **९६४६ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील खालावलेली भूजल पातळी आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न यामुळे शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामपंचायत तसेच वैयक्तिक वॉटर फिल्टर प्लांट सुरु करण्यात आले असून या वॉटर फिल्टर प्लांटद्वारे शुध्द पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली अनेक ठिकाणी अशुध्द पाण्याचे जार विक्री करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यात अडीच हजारांहून अधिक वॉटर फिल्टर प्लांट्स असून सदर प्लांटची तपासणी करण्यासाठी यंत्रणाच कार्यरत नसून अन्न व औषध प्रशासन विभाग त्यांना केवळ बाटलीबंद पाण्याची गुणवत्ता तपासणीचे अधिकार असल्याचे सांगून याबाबतची जबाबदारी टाळत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यातील संपूर्ण वॉटर फिल्टर प्लांटची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व शुध्द पाण्याच्या नावाखाली अशुध्द पाण्याची विक्री करणाऱ्यांवर आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही, वॉटर फिल्टर प्लांटव्दारे शुध्द पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली अनेक ठिकाणी अशुध्द पाण्याचे जार विक्री करण्यात येत असल्याची कोणतीही बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आलेली नाही.केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ५ टक्के निधी हा पाणी गुणवत्तेसाठी निश्चित करण्यात आला आहे.या अंतर्गत पाणी शुद्धीकरणासाठी काही अपरिहार्य कारणास्तव कायमस्वरूपी उपाययोजना करणे शक्य नसल्यास, पाणी गुणवत्ता बाधित वाड्या वस्त्यांसाठी तात्पुरती उपाययोजना म्हणून पाणी शुद्धीकरण यंत्रणा (वॉटर फिल्टर प्लांट) बसवण्याबाबतचा निर्णय दिनांक १५/०७/२०१४ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला. त्यानुसार राज्यात एकूण ६४८ संयंत्रे टप्प्याटप्प्याने बसविण्यात आली. तथापि, केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम बंद झाला असल्याने सन २०१८ नंतर पाणी शुद्धीकरण यंत्रणा (वॉटर फिल्टर प्लांट) बसविण्याबाबतची कोणतीही योजना या विभागामार्फत राबविण्यात येत नाही.नागरिकांना वैयक्तिक वॉटर फिल्टर प्लांट बसविण्यास निधी देणे अथवा त्यांच्या स्वखर्चातून बसविण्यास परवानगी देण्याबाबतची कोणतीही योजना या विभागामार्फत राबविण्यात येत नाही.
(२) उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार नांदेड जिल्ह्यात केवळ ७ पाणी शुद्धीकरण यंत्रणा (वॉटर फिल्टर प्लांट) बसविण्यात आल्या. त्यापैकी ४ संयंत्र कार्यरत असून त्याद्वारे शुध्द पाण्याचा पुरवठा केला जात असून त्यामधून अशुध्द पाणीपुरवठा केला जात असल्याची कोणतीही तक्रार शासनास प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबईमधील आयव्हीएफ व सरोगसी केंद्रांना परवाना वितरीत करण्याबाबत

**(२३) * ८६८७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः मुंबई सारख्या शहरांमध्ये आयव्हीएफ आणि सरोगसी केंद्रांची संख्या झपाट्याने वाढत असून सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (ART) नियमन कायदा २०२१ आणि सरोगसी (नियमन) कायदा २०२१ अन्वये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार या केंद्रांना नोंदणी किंवा नूतनीकरण करणे अनिवार्य करण्यात आले असून, या प्रक्रियेतर्गत केंद्रांनी त्यांच्याकडील वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेनुसार एक ते दोन लाख रुपये शुल्क जमा करून दोन वर्षे होऊनही सदर अनेक केंद्रांना अद्याप परवाना मिळाला नसल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी अशा केंद्रांमध्ये कृत्रिम गर्भधारणेशी संबंधित सर्व स्तरांवरील वैद्यकीय प्रक्रिया छुप्या पध्दतीने केल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यासह मुंबईमध्ये आयव्हीएफ तसेच सरोगसी केंद्रांना कायदेशीर परवाना वितरीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

केंद्र शासनामार्फत सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा २०२१ व सरोगसी (नियमन) कायदा २०२१ दिनांक १८ डिसेंबर,२०२१ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर दोन्ही कायद्यानुसार केंद्रांना नोंदणीसाठी केंद्र शासनाच्या नॅशनल रजिस्ट्री पोर्टलवर अर्ज करणे बंधनकारक आहे. त्यानुसार केंद्रांनी नोंदणीसाठी केंद्र शासनाच्या नॅशनल रजिस्ट्री पोर्टेलवर अर्ज करुन विहित शुल्क भरलेल्या केंद्रांची सन २०२२ ते १५ जून २०२६ पर्यंत खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झाले आहेत.

• राज्यात एकूण १,४३८ केंद्रांनी नोंदणीसाठी अर्ज व शुल्क भरले असून त्यापैकी २७५ केंद्रे मुंबईतील आहेत.

• राज्यातील ९०१ केंद्रांना (मुंबईतील १३९ केंद्रांसह) युनिक नोंदणी क्रमांक (URN) देऊन नोंदणी देण्यात आले आहे.

• राज्यातील १६१ प्रस्ताव (मुंबईतील १८ प्रस्तावांसह) राज्य स्तरावर प्राप्त असून मंजुरीनंतर नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल.

• राज्यातील ११६ प्रस्तावांमध्ये (मुंबईतील ४५ प्रस्तावांसह) त्रुटी आढळल्याने ते दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात आले आहेत.

• राज्यातील ७० केंद्रांनी (मुंबईतील ४ केंद्रांसह) अर्ज रद्द/मागे घेण्याची विनंती केली आहे.

• ९३ प्रस्ताव (मुंबईतील २९ केंद्रासह) जिल्हा /महानगरपालिका स्तरावर प्रलंबित आहेत.

• ९७ प्रस्ताव (मुंबईतील ४० केंद्राच्या प्रस्तावासह) विभागीय समितीच्या शिफारसीसह राज्य स्तरावर प्राप्त होणे बाकी आहे.

• त्यामुळे अर्ज व शुल्क भरलेल्या राज्यातील ४६७ केंद्रांना (मुंबईतील १३२ केंद्रांना) अद्याप परवाना मिळालेला नाही.

सन २०२५-२६ मध्ये राज्यातील ३८८ केंद्रांना (मुंबईतील ६७ केंद्रांसह) नोंदणी देण्यात आली.
(२) होय, हे खरे आहे.

कायद्यातील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या सुचनेनुसार जिल्हा / मनपा समुचित प्राधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये वसई विरार मनपा - ३, नागपूर मनपा - ३ व चंद्रपूर मनपा - २ केंद्र छुप्या पध्दतीने वैद्यकीय प्रक्रिया करतांना आढळून आले असून त्यांच्यावर संबंधित महानगरपालिका समुचित प्राधिकाऱ्यांमार्फत कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) राज्य स्तरावर जिल्हा/मनपा समुचित प्राधिकाऱ्यांच्या शिफारसीनंतर प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, राज्य समुचित प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर युनिक नोंदणी क्रमांक देऊन नोंदणी प्रमाणपत्र जारी केले जात आहे. प्रलंबित व त्रुटीपूर्ण प्रस्ताव निकाली काढण्यासाठी एप्रिल, २०२६ मध्ये विशेष मोहीम राबविण्यात

आली आणि ही प्रक्रिया निरंतर आहे. तसेच सर्व जिल्हे, मनपा व परिमंडळांना प्रलंबित प्रस्तावांची त्वरित तपासणी करून परिपूर्ण प्रस्ताव राज्य स्तरावर पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नियमित पाठपुराव्याद्वारे प्रक्रिया लवकर पूर्ण करून पात्र व शुल्क भरलेल्या सर्व केंद्रांना नोंदणी प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नवीन डेटा सेंटरकरीता पाण्याची उपलब्धता करुन देण्याबाबत

**(२४) * ८८२५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रिलायन्स, अदानी, गुगल आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या कंपन्यांकडून डेटा सेंटर सुरु करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जात असून सुमारे १०० मेगावॅट क्षमतेच्या एका डेटा सेंटरला थंड ठेवण्यासाठी दररोज २० लाख लिटर पाण्याची आवश्यकता लागते जे हजारो कुटूंबियांच्या दैनंदिन गरजे इतके असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत ६० ते ८० टक्के डेटा सेंटर्स हे आधीच पाणी टंचाई भासत असलेल्या भागात उभारले जात असून वाढत्या पाणी वापरामुळे घरगुती वापराकरीता व शेतीसाठी लागणाऱ्या पाणी उपलब्धतेवर परिणाम होत असल्याने डेटा सेंटर्स उभारण्यात आलेल्या भागातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होत असून सदर डेटा सेंटर्स उभारणीस स्थानिक स्तरावर विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नवीन डेटा सेंटरला परवानगी देताना पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यासाठी आणि पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवर ताण पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१९ मध्ये डेटा सेंटर क्षेत्राची प्राधान्य क्षेत्र म्हणून ओळख करण्यात आलेली आहे. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ अंतर्गत डेटा सेंटरच्या विकासासाठी स्वतंत्र तरतुदी व प्रोत्साहने समाविष्ट करण्यात आली आहेत. डेटा सेंटर ही डिजिटल अर्थव्यवस्था, क्लाऊड सेवा, कृत्रिम बुध्दिमत्ता, डिजिटल व्यवहार, ई-गव्हर्नन्स तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्तारासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आहेत.

डेटा सेंटरचा प्रत्यक्ष पाणीवापर हा डेटा सेंटरची क्षमता, वापरण्यात येणारी शीतकरण प्रणाली, तंत्रज्ञान, कार्यक्षमता, भौगोलिक व हवामानविषयक परिस्थिती तसेच पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापरावर अवलंबून आहे.

डेटा सेंटरमध्ये सर्व्हर व संबंधित उपकरणांच्या शीतकरणासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. सदर पाण्याची आवश्यकता गोड्या पाण्याऐवजी पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याद्वारे पूर्ण करणे हे तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य, पर्यावरणपूरक व दीर्घकालीन शाश्वत उपाय आहे.

(२) व (३) नागरी भागातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन शुध्द केलेल्या तथापि, पिण्यास अयोग्य असलेल्या पाण्याचा वापर प्रस्तावित डेटा सेंटरकरीता करण्याचे प्रयोजन आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिका तसेच सिडको सोबत प्रत्येकी ४० दशलक्ष लिटर प्रती दिन प्रक्रिया केलेले सांडपाणी पुरविण्यासाठी सामंजस्य करार केला आहे.

तसेच भविष्यातील वाढीव मागणीचा विचार करुन नवी मुंबई महानगरपालिकेकडून २०० दशलक्ष लिटर प्रती दिन तसेच ठाणे महानगरपालिकडून १५० दशलक्ष लिटर प्रती दिन प्रक्रिया केलेले सांडपाणी पुरविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सामंजस्य करार करण्यासाठी सदर महानगरपालिकेला विनंती केली आहे.

महाराष्ट्र जागतिक दर्जाचे डेटा सेंटर केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने संबंधित महानगरपालिकांनी प्रक्रिया केलेले सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या वाहिनी टाकण्यासाठी आवश्यक मार्गाधिकार (Right of Way), पायाभूत सुविधा उभारण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या, इ. तात्काळ देण्याबाबत नगरविकास विभागास विनंती करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे एमआयडीसी व डेटा सेंटर्सच्या संयुक्त विद्यमाने Desalination चा प्रकल्प उभारुन सदर पाण्याचा उपयोग डेटा सेंटर्ससाठी करता येईल का, यासंदर्भातही शासन स्तरावर विचार सुरु आहे.

पिण्याचे पाणी/शेतीसाठीचे पाणी (Fresh Water) याचा डेटा सेंटर करीता वापर होणार नाही, हा शासनाचा प्रयत्न राहील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(२५)** * ८९८७ **श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेमार्फत जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांसाठी सोलर प्रकल्प उभारणीत सुमारे ६ कोटी रुपयांची कामे संबंधित ठेकेदाराने निविदा प्रक्रिया (Tender Process) पूर्ण होण्यापूर्वीच आणि कार्यादेश (Work Order) मिळण्यापूर्वीच प्रत्यक्षात सुरू केल्याची व सदर निविदा प्रक्रियेस मागील तारखेपासून (Backdated) कार्यारंभ आदेश देण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलर प्रकल्प निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी कामे/पुरवठा करण्यास परवानगी देण्यामागील कारणे काय आहेत तसेच संबंधित कामांची एकूण किंमत, कंत्राटदारांची नावे व मंजुरी प्रक्रियेत अनियमितता करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची शासनामार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशीअंती दोषी आढळलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्हा परिषदेमार्फत जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांसाठी सोलर प्रकल्प उभारणीकरीता ठेकेदाराने निविदा प्रक्रिया (Tender Process) पूर्ण होण्यापूर्वीच आणि कार्यादेश (Work

Order) मिळण्यापूर्वीच प्रत्यक्षात सुरू केल्याची वा सदर निविदा प्रक्रियेस मागील तारखेपासून (Backdated) कार्यारंभ आदेश देण्यात आल्याची बाब खरी नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबई येथील अनधिकृत शुश्रुषागृहांवर कारवाई करण्याबाबत

**(२६) * ९२७० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह मुंबईमध्ये विना नोंदणीकृत आणि अनधिकृत शुश्रुषागृह आणि बोगस दवाखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून या बेकायदेशीर केंद्रांमुळे सामान्य रुग्णांच्या विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या जिवाला गंभीर धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शुश्रुषागृहाध्ये अवैध दत्तक विधान (Wrongful Adoption), रुग्णाचा मृत्यू, उपचारादरम्यान किंवा प्रसुतीदरम्यान हलगर्जीपणामुळे झालेली गुंतागुंत तसेच उपचारादरम्यान रुग्णांची परिस्थिती बिकट झाल्यानंतर रुग्णाला दुसऱ्या रुग्णालयात पाठविणे इ. गैरप्रकार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अश्या अनधिकृत व विनानोंदणी शुश्रुषागृहांची संख्या किती आहे तसेच सदर अनधिकृत शुश्रुषागृहांवर कारवाई करण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अश्या अनधिकृत शुश्रुषागृहांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट,१९४९ अंतर्गत महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम(सुधारित),२०२१ नुसार राज्यातील सर्व नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांची तपासणी संबंधित स्थानिक पर्यवेक्षिय प्राधिकारी यांचेमार्फत नियमितपणे वर्षातून कमीत कमी दोन वेळा करण्यात येते. सदर तपासणीमध्ये सदर बाब निदर्शनास आढळून आलेली नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

दत्तक विधान बाबत महिला व बालविकास विभागांतर्गत बालकल्याण समितीकडून नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

तसेच उपचारादरम्यान किंवा प्रसतीदरम्यान पेशंटची परिस्थिती बिकट झाल्यास सदर रुग्णाच्या जिवितास धोका होऊ नये यासाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा असलेल्या दुसऱ्या रुग्णालयात पाठविणे गरजेचे असते.

अनधिकृत व विना नोंदणी शुश्रुषागृहांवर कारवाई करण्यासाठी तक्रार प्राप्त झाल्यास राज्यात जिल्हा स्तरावर स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी यांचे अधिनस्त सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आले असून, अनधिकृत व विनानोंदणी शुश्रुषागृहांवर बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अंतर्गत महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम (सुधारित),२०२१ अन्वये कारवाई करण्यात येते.

(४) अनधिकृत शुश्रुषागृहांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यात माहे, २०२५ मध्ये धडक मोहिम राबविण्यात आली आहे. धडक मोहिमेत दोषी आढळलेल्या रुग्णालयांवर बॉम्बे नर्सिंग होम्स ॲक्ट, १९४९ अंतर्गत महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१ नुसार राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयांना नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर औद्योगिक वसाहतीमध्ये स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत

**(२७) * ९८१३ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) औद्योगिक वसाहत परिसरातील कापड उद्योग कंपन्यांमध्ये घडलेल्या भीषण आगीच्या घटनेत यंत्रसामुग्री, कच्चामाल व तयार माल जळून खाक झाल्याने सुमारे १५ कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले असून अनेक कामगारांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेवेळी नवापूर एमआयडीसी परिसरात स्वतंत्र व सुसज्ज अग्निशमन केंद्र, पुरेशी फायर फायटिंग यंत्रणा, हायड्रंट सिस्टीम व आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था उपलब्ध नसल्याने आग आटोक्यात आणण्यास विलंब झाला तसेच नंदुरबार-नवापूर महामार्गाच्या दुरवस्थेमुळे अग्निशमन दलाची वाहने वेळेत पोहोचू शकली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कंपन्यांमध्ये नियमित फायर ऑडिट, सुरक्षा तपासणी व आपत्कालीन व्यवस्थापन प्रणालीमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीअंती सदर आगीत बाधित झालेल्या उद्योग कंपन्या व प्रभावित कामगार कुटुंबांना शासनामार्फत विशेष आर्थिक मदत वा नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी नवापूर एमआयडीसीसह राज्यातील सर्व एमआयडीसी परिसरात स्वतंत्र सुसज्ज अग्निशमन केंद्र, अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा व नियमित फायर ऑडिट बंधनकारक करणे व कामगारांसाठी आपत्कालीन प्रशिक्षण देणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे आहे.

दिनांक ११/०५/२०२६ रोजी एमआयडीसी, नवापूर, जि.नंदुरबार येथील प्लॉट क्र. ई-२१ मध्ये स्थित श्री न्युओ फॅशन प्रा. लि. या कारखान्यात आग लागण्याची घटना घडली होती. सदर प्लॉट हा ग्रुप वर्कशेड असून एकाच शेडमध्ये खालील सहा औद्योगिक आस्थापना कार्यरत होत्या :-

१) श्री न्युओ फॅशन प्रा. लि.
२) ए. एन. टेक्सटाईल्स
३) एच. आर. टेक्सटाईल्स
४) एन. एम. टेक्सटाईल्स
५) एन. आर. टेक्सटाईल्स
६) एस. एन. टेक्सटाईल्स

सदर आगीमध्ये वरील सर्व सहा औद्योगिक आस्थापनांच्या शेड, यंत्रसामग्री तसेच इतर मालमत्तेचे नुकसान झाले. तसेच प्लॉट क्र. ई-२२, एमआयडीसी, नवापूर येथे स्थित रिचीरिच टेक्सटाईल्स प्रा. लि. या कारखान्याच्या शेड व यंत्रसामग्रीचेही आगीमुळे नुकसान झाले. सदर घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसून कोणतीही व्यक्ती जखमी झालेली नाही.

(२) नवापूर औद्योगिक क्षेत्रापासून नवापूर शहरातील अग्निशमन केंद्र सुमारे ३ कि.मी. अंतरावर असून, औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. ई-२१ व ई-२२ येथे आग लागल्याची माहिती प्राप्त होताच नवापूर नगरपरिषदेचा ०१ अग्निशमन बंब तात्काळ घटनास्थळी दाखल झाला.

तथापि, आगीचे स्वरूप मोठे व तीव्र असल्यामुळे आग विझविण्यासाठी नवापूर, धुळे, साक्री, नंदुरबार, पिंपळनेर तसेच सोनगड (गुजरात) येथून प्रत्येकी ०१ असे एकूण ०६ अग्निशमन बंब घटनास्थळी उपलब्ध करून देण्यात आले. संबंधित अग्निशमन दल, स्थानिक प्रशासन व इतर यंत्रणांनी समन्वयाने शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली व पुढील नुकसान टाळण्यात यश मिळविले.

(३) व (४) कामगार विभागातंर्गत असलेल्या औदयोगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (DISH) यांच्यामार्फत करण्यात आलेल्या चौकशीदरम्यान पुढील कायदेभंग आढळून आले :-

१. महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियम ४(४) चा भंग.

२. महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियम ४(१)(अ), ४(१)(ब) व ४(१)(क) चा भंग.

चौकशीअंती संबंधित सातही कारखाने औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (DISH) कार्यालयाकडे नोंदणीकृत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित आस्थापनांना व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० च्या कलम ११०(१) अन्वये परवाना प्राप्त करून घेणे तसेच कारखान्यांचे नकाशे मंजूर करून घेण्याबाबत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

नवापूर (जि.नंदुरबार) औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना आपत्कालीन परिस्थितीत त्वरित अग्निशमन सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत नवापूर औद्योगिक क्षेत्रात नवीन अग्निशमन केंद्र उभारण्याचे काम हाती घेण्यात आले असून ते सध्या प्रगतीपथावर आहे. सदर काम ऑगस्ट, २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील रुग्णांसाठी मोफत व उत्तम दर्जाची आरोग्यसेवा पुरविण्याबाबत

**(२८) * १००९० श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड तालुक्यातील झडपोली येथील एका महिलेची सातव्या महिन्यात अकाली प्रसूती झाल्याने नवजात बाळ अशक्त होते आणि त्याच्या फुफ्फुसाची क्षमता वाढवण्यासाठी अतिदक्षता उपचारांची गरज असताना पुढील उपचारासाठी जव्हार कुटीर रुग्णालयातून नाशिकच्या खाजगी रुग्णालयात पाठवण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जव्हार, मोखाडा, विक्रमगड तालुक्यांमधील रुग्णांना नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात येत असून शासकीय जिल्हा रुग्णालय उपलब्ध असतानाही रुग्णांना खाजगी रुग्णालयात पाठविले जाते यामागे जव्हार कुटीर रुग्णालयातील काही वैद्यकीय अधिकारी, प्रशासन आणि संबंधित खाजगी रुग्णालय यांच्यात काही आर्थिक संबंध किंवा कमिशनची साखळी असल्याची शंका नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड तालुक्यातील रुग्णांसाठी मोफत व उत्तम दर्जाचे उपचार होण्याकरीता तसेच उक्त प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर घटनेच्या अनुषंगाने उपसंचालक स्तरावरून त्रिसदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली होती. या चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर नवजात शिशूला Extreme Prematurity with very low birth weight with respiratory distress Syndrome या कारणास्तव Inj.Surfactant व ventilator ची आवश्यकता असल्याने सदर व्यवस्था उपलब्ध असलेल्या व MJPJAY योजनेमध्ये शासनामार्फत अंगीकृत केलेल्या आयुष बाल रुग्णालय,नाशिक येथे संदर्भित करण्याची आवश्यकता होती.त्यानुसार बाळाला नाशिक येथील खाजगी रुग्णालयात संदर्भित करण्याचा निर्णय योग्य असल्याचे अहवालात नमूद आहे. या नुसार सदर प्रकरणी कोणीही दोषी आढळून आले नाही.

पालघर जिल्ह्यात जिल्हा रुग्णालय पालघर अधिनस्त जव्हार, मोखाडा, विक्रमगड व इतर कार्यरत उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये येथे आवश्यकतेनुसार वैद्यकीय साधन सामुग्री व उपकरणे उपलब्ध आहेत. त्यानुसार रुग्णालयामध्ये कार्यरत असलेल्या सर्व तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना प्राथमिक व द्वितीय स्तरावरील उपलब्ध असलेल्या आवश्यक त्या सर्व उपचारात्मक दर्जेदार वैद्यकीय सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काशिळ (ता.जि.सातारा) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करण्याबाबत

**(२९) * १०११३ श्री.प्रमोद जठार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे काशिळ (ता.जि.सातारा) येथील राष्ट्रीय महामार्ग -४८ लगत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर तब्बल २० गावातील हजारो नागरिकांना उपचारासाठी अवलंबून राहावे लागत असल्याची बाब माहे, एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काशिळ हे गाव राष्ट्रीय महामार्गावर (पुणे-बँगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८) स्थित असून येथे अपघातांचे प्रमाण मोठे आहे, त्यामुळे अपघातातील जखमींना 'गोल्डन अवर'मध्ये (Golden Hour) तातडीची वैद्यकीय मदत मिळणे अत्यंत आवश्यक असताना, ट्रॉमा केअर सेंटर अभावी जखमींना उपचारासाठी दूर अंतरावरील रुग्णालयात न्यावे लागल्याने अनेकदा अपघातग्रस्त रुग्णांना जीव गमवावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात राष्ट्रीय महामार्गालगत एकमेव ट्रॉमा केअर सेंटर असून जिल्ह्यात काशिळ येथील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून ट्रॉमा केअर सेंटरमध्ये रूपांतर करावे व ग्रामीण रुग्णालयात पुरेशी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, परिचारिका आणि मदतनीसाची पदे तात्काळ भरावीत आणि आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतच्या मागण्या येथील नागरिकांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) काशिळ येथील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून ट्रॉमा केअर सेंटरमध्ये रुपांतर करावे अशी मागणी असल्याचे खरे आहे.

तथापि, सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक २९/०५/२०२५ अन्वये शासनाने असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, नव्याने रुग्णालय संस्थांच्या बांधकामास मान्यता न देता आधीच हाती घेण्यात आलेली रुग्णसंस्थेची बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य रुग्णसेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यकतेनुसार नवीन ठिकाणी बांधकामांना मान्यता देण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित मानधन अदा करणेबाबत

**(३०) * १०३४० श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना ही समाजातील विधवा माता, एकल पालक, दिव्यांग पालक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना असून मागील एक वर्षापासून राज्यातील अनेक पात्र लाभार्थ्यांचे मानधन प्रलंबित ठेवण्यात आल्याने अनेक दुर्बल घटकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्याास, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन या योजनेंतर्गत २०२५-२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४५३४ अनाथ, बेवारस मुले-मुली पात्र लाभार्थ्यांना दरमहा २२५० रुपये आर्थिक मदत मिळणे अपेक्षित असताना निधी अभावी सदर पात्र मुले अद्यापही आर्थिक मदतीपासून वंचित राहिली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित वेतन मिळण्यासाठी शासनस्तरावर वारंवार पाठपुरावा करूनही अद्यापपर्यंत मानधन न मिळाल्याने गरीब कुटुंबांच्या शिक्षण, औषधोपचार व दैनंदिन खर्चाचा प्रश्न उद्भवला असल्याने उक्त योजनेंतर्गत पात्र मुला-मुलींना त्वरीत आर्थिक मदत मिळावी याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२) व (३) क्रातीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्याकरीता सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये अनुदान वितरीत करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ५/०६/२०२६ अन्वये निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी DBT प्रणाली द्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोकुळदास तेजपाल रुग्णालय प्रशासनाने खरेदी केलेल्या गोल्फ कार्ट वाहन खरेदी प्रक्रियेची चौकशी करण्याबाबत

**(३१)** * **९६४५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोकुळदास तेजपाल रुग्णालय प्रशासनाने सामाजिक उत्तरदायीत्वातून (सीएसआर) १० लाख रुपयांना माहे जानेवारी, २०२६ मध्ये खरेदी केलेले दोन गोल्फ कार्ट (कार) गेल्या तीन महिन्यांपासून विनावापर पडून असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गोल्फ कार्ट (कार) खरेदी करतांना शासनाच्या नियमानुसार प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक असतानाही नियम डावलून प्रशासकीय मान्यता न घेता खरेदी करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सीएसआर निधी वापरणे आवश्यक असल्याने प्रशासनाने अनावश्यक गोल्फ कार्ट (कार) सारख्या वस्तूची खरेदी करण्यामागची नेमकी कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर खरेदी केलेली गोल्फ कार्ट (कार) कोणत्याही कामासाठी अद्याप वापर झालेला नसल्याने सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अशा स्वरुपाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. तथापि, सदर दोन गोल्फ कार्ट (कार) IDBI बँकेकडून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई परिसर या संस्थेस CSR द्वारे प्राप्त झाल्या आहेत. या दोन कार्टची एकूण किंमत रुपये १०.०० लाख असून त्या संस्थास्तरावर खरेदी करण्यात आल्या नाहीत. सदर ०२ गोल्फ कार्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास संलग्नित गोकुळदास तेजपाल रुग्णालय व कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई येथे सद्य:स्थितीत वापरात आहेत.

(२) व (३) सीएसआर द्वारे संस्थेस कोणताही निधी प्राप्त झालेला नसून गोल्फ कार्ट (कार) ची संस्थास्तरावर खरेदी झालेली नाही. सदर वस्तू ह्या संस्थेस देणगी स्वरुपात प्राप्त झाल्या आहेत.
(४) देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या सदर ०२ गोल्फ कार्ट गाड्यांपैकी १ गाडी कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई या संस्थेला हस्तांतरीत करण्यात आलेली असून एक गाडी गोकुळदास तेजपाल रुग्णालयमध्ये वापरात आहे. ज्येष्ठ नागरिक, गरोदर स्त्रिया, आजारी व अपंग अशा चालण्यास असमर्थ असलेल्या रुग्णांना रुग्णालयीन आवारातील विविध विभाग तसेच विविध चाचण्यां करीता जाण्याकरीता सदर गोल्फ कार्टचा वापर करण्यात येत आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात टी.एम.एस. २.० प्रणाली अंतर्गत रुग्णांना अत्याधुनिक उपचार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) * ९५४४ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' (AB-PMJAY) आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) चे एकत्रिकरण करून टी. एम. एस. २.० प्रणाली सुरू केली असून या योजनेंतर्गत राज्यातील रुग्णालयांमध्ये २,३९९ विविध आजारांवर मोफत उपचार केले जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात उपचारासोबत सर्व प्रकारच्या वैद्यकीय तपासण्या, रुग्णांना लागणारा औषधोपचार यावर रुग्णांचा मोठ्या प्रमाणामध्ये खर्च होत असून कॅन्सर, मेंदूरोग व इतर अवघड आजारामध्ये अनकेवेळा वरील सर्व रूग्णालयांमध्ये आवश्यक ती शस्त्रक्रिया व इतर उपचार उपलब्ध नसल्यामुळे या सर्व योजना केवळ नाममात्र असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नवीन प्रणालीमध्ये नोंदणी करण्यासाठी पाच ते सात दिवसांचा कालावधी लागत असून त्यामुळे गंभीर रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाही तसेच रेशन कार्डची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण नसल्याने किंवा रेशन कार्डवर नाव नसल्याने अनेक गरजू रुग्ण या योजनेच्या लाभापसून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांना वेळेत उपचार मिळण्याबाबत आवश्यक ती अत्याधुनिक उपचार सामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच टी.एम.एस. २.० प्रणाली योजना यशस्वीपणे राबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २४/०२/२०२६ पासून एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व अंगीकृत रूग्णालयांमार्फत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या TMS २.० प्रणालीवर कार्यान्वित केली आहे. यामध्ये २३९९ उपचारांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयात रोख रक्कम विरहित सुविधा उपलब्ध असून सर्व उपचारांच्या पॅकेजमध्ये वैद्यकीय तपासण्या, शस्त्रक्रिया, औषधोपचार, आहार इ.बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत e-KYC पूर्ण झालेल्या रुग्णांची TMS २.० प्रणालीव्दारे नोंदणी करुन विनाविलंब उपचार सुरु करण्यात येतात. e-KYC न झालेल्या रूग्णांची रुग्ण उपचारांपूर्वी e-KYC प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यासाठी रुग्णालयात नियुक्त आरोग्य मित्र यांच्या सहकार्याने कमीत कमी कालावधीत ही प्रक्रिया पूर्ण करुन सदर प्रणालीवर रुग्ण नोंदणी करण्यात येते.

(४) टी.एम.एस. २.० प्रणालीवर रुग्णनोंदणी व e-KYC प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करुन उपचारांस होणारा विलंब कमी करण्यासाठी राज्य आरोग्य हमी सोसीयटी यांच्यावतीने रुग्णालय स्तरावर व्यवस्था निर्माण करण्यात आली असून प्रशिक्षण व पर्यवेक्षणाव्दारे त्यामध्ये सतत सुधारणा करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यामधील जलसंधारणाच्या कामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * ९०१८ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA), महाराष्ट्र यांच्यामार्फत सोलापूर जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या अटल भूजल योजनेंतर्गत जलसंधारणाच्या कामांमध्ये (रिचार्ज शाफ्ट, सिमेंट बंधारे, पाझर तलाव दुरुस्ती) संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने ५० कोटींहून अधिक रकमेचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची निविदा विशिष्ट व मर्जीतील कंत्राटदाराला अर्थपूर्ण व्यवहार करुन मंजूर अंदाजपत्रकामध्ये काम न करता गैरपध्दतीने कामे करुन मापन पुस्तिकेमध्ये प्रत्यक्षात वेगळया नोंदी करुन निकृष्ट दर्जाची कामे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकारी व कंत्राटदारावर यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) नाही, हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यामध्ये अटल योजनेंतर्गत एकूण ४१ कामे (सिमेंट नाला बांध, पाझर तलाव दुरुस्ती व गेटेड चेक डॅम) मंजूर आहेत. या सर्व कामांची निविदा स्वीकृती किंमत रुपये १४.५४ कोटी एवढी आहे. तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत २०२२ ते २०२६ पर्यंत २०९० रिचार्ज शाफ्ट करण्यात आले. रिचार्ज शाफ्ट साठी १४.९५ कोटी इतका प्रत्यक्ष खर्च करण्यात आला.

सदर योजनेंतर्गत बांधण्यात आलेले सर्व सिमेंट नाला बांध (CNB) व पाझर तलाव पावसाळ्यात दोनदा पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. यामुळे परिसरातील भूजल पातळीत लक्षणीय वाढ होऊन स्थानिक शेतकऱ्यांना अप्रत्यक्ष सिंचनाचा मोठा फायदा झाला आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

सदर योजनेतील सर्व कामांची निविदा प्रक्रिया शासनाच्या ई-निविदा (E-Tendering) प्रणालीद्वारे आणि विहित मार्गदर्शक तत्त्वांनुसार अत्यंत पारदर्शकपणे राबविण्यात आली आहे. प्रत्यक्ष स्थळी मंजूर अंदाजपत्रक व तांत्रिक विनिर्देशनांनुसार कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

सर्व कामांच्या गुणवत्ता नियंत्रण चाचण्या घेण्यात आल्या असून, मापन पुस्तिकेत प्रत्यक्ष कामाच्या अचूक नोंदी घेतल्यानंतर आणि जिओटॅग (Geotagged) छायाचित्रांची पडताळणी केल्यानंतरच देयके अदा करण्यात आली आहेत.

(३) सदर कामासंदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण पथक, मृद व जलसंधारण विभाग, पुणे यांच्यामार्फत चौकशीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. चौकशीअंती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १८ वर्षांवरील अनाथ मुलींकरीता रोजगार व प्रशिक्षण सहाय्य योजना राबविण्याबाबत

**(३४) * ८६६३ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनाथ मुलींचे संगोपन वयाच्या १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत विविध शासकीय बालगृह तसेच मान्यताप्राप्त संस्थांमार्फत केले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व विवाह न झालेल्या अनाथ मुलींचे शिक्षण, रोजगार, निवास व सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून कोणती संगोपनोत्तर काळजी / पुनर्वसन यंत्रणा कार्यरत केली आहे काय तसेच त्यांच्या विवाह, रोजगार किंवा सामाजिक स्थितीबाबत निरिक्षण/देखरेख प्रणाली उपलब्ध आहे काय,

(३) असल्यास, अशा मुलींचे शोषण, बेघर, मानवी तस्करी होऊ नये याकरीता त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यस्तरीय Digital Tracking व Follow-up Mechanism सुरु करण्याबाबत तसेच अशा अनाथ मुलींसाठी १८ वर्षांनंतर स्वतंत्र निवास, कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार व विवाह सहाय्य योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) होय

राज्यातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या अनाथ व पुनर्वसनाची गरज असलेल्या मुलींना त्यांच्या वयाच्या २१ वर्षा पर्यंत (अपवादात्मक स्थितीत २३ वर्षापर्यंत) पुनर्वसनासाठी After care साठी अनुरक्षणगृहामध्ये दाखल करण्यात येते, व अनुरक्षणगृहामार्फत त्यांच्या विवाह, रोजगार किंवा सामाजिक स्थितीबाबत निरीक्षण/देखरेख (Monitoring) करण्यात येते.

वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या किंवा अनुरक्षण गृहातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक प्रवेशितेचा जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि संबंधित संस्थेमार्फत पुढील ३ वर्षापर्यंत नियमित Follow-up घेतला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तासगाव, कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यांतील प्रस्तावित औद्योगिक वसाहत सुरु करण्याबाबत

**(३५) * ९५२० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तासगाव, कवठेमहांकाळ (जि.सांगली) येथील मतदार संघातील मणेराजुरी, योगेवाडी, अलकुड येथील प्रस्तावित औद्योगिक वसाहत मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने हा परिसर विकासापासून वंचित राहत असल्याने स्थानिक बेरोजगार तरुण व उद्योजकांनी नाराजी व्यक्त केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मणेराजुरी, योगेवाडी, अलकुड औद्योगिक वसाहतीचा प्रकल्प हा तासगाव, कवठेमहांकाळ तालुक्यांच्या विकासासाठी महत्वपूर्ण असल्याने सदर औद्योगिक विकास महामंडळाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) तासगाव व कवठेमहांकाळ तालुक्यातील मणेराजुरी, योगेवाडी, अलकुड (एम) तसेच इतर गावांचा समावेश असलेल्या प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रासाठी एकूण १४९९.२९ हेक्टर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून त्यामध्ये १२९८.६७ हेक्टर खाजगी व २००.६२ हेक्टर सरकारी क्षेत्राचा समावेश आहे. सदर क्षेत्रासंदर्भातील अधिसूचना शासन राजपत्रात वेगवेगळया कालावधीत प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रकल्प तासगाव व कवठेमहांकाळ तालुक्यांच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असून शासन व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे:-

(अ) मौजे योगेवाडी व मणेराजुरी येथील एकूण १०१.३२ हेक्टर सरकारी क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात आलेले आहे.

(आ) मा.उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०१/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत सदर क्षेत्रात शेतीपूरक / ग्रीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(इ) मौजे योगेवाडी येथील गट क्र. २०० व २४१ मधील ३७.७६ हेक्टर क्षेत्रात पायाभूत सुविधा व विकासकामे अभियांत्रिकी विभागामार्फत सुरू आहेत.

(ई) दिनांक २७/०५/२०२६ रोजी मा.प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात आली असून, सरकारी क्षेत्रालगतच्या खाजगी जमिनींचे वाटाघाटीद्वारे भूसंपादन करून क्षेत्र विकसित करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रस्तावाच्या अंमलबजावणीस विलंब होण्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

(अ) अधिसूचित खाजगी क्षेत्रातील काही गावांमधील खातेदारांनी ग्रामपंचायतींच्या ठरावासह भूसंपादनास विरोध दर्शविला आहे.

(आ) मणेराजुरी येथील काही गटांच्या मोजणी व हद्द कायम करण्याच्या कामास लगतच्या खातेदारांचा विरोध असल्याने सदर काम प्रलंबित आहे.

(इ) उर्वरित खाजगी क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण होणे आवश्यक आहे.

तथापि, उपलब्ध सरकारी क्षेत्र विकसित करणे तसेच आवश्यकतेनुसार खाजगी जमिनींचे वाटाघाटीद्वारे संपादन करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरू आहे.

-----------------

## गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६)** * **८७६२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवांचा विस्तार करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांसह सुसज्ज नवीन इमारत उभारण्यात आली असून या रुग्णालयात रुग्णांसाठी उभारण्यात आलेल्या नेत्रविभाग व कुटुंब नियोजन विभाग सर्व सोईयुक्त असून सदर ठिकाणी आवश्यक असणारे वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर व सहायक कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे येथे रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात काही महिन्यांपूर्वी सिझरीयन व इतर शस्त्रक्रियाकरीता सुसज्ज ऑपरेशन थिएटर उभारण्यात आले असून स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ आणि भूलतज्ज्ञ यांसारख्या तातडीच्या सेवा देणाऱ्या तज्ज्ञांची पदे रिक्त असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना किरकोळ उपचारांनंतर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात किंवा खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपजिल्हा रुग्णालयातील मंजूर पदे तात्काळ भरुन ग्रामीण रुग्णांना सेवा देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) या उपजिल्हा रुग्णालयासाठी स्वतंत्र नेत्रविभाग उभारण्यात आलेला नाही. तसेच कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नियमित होत आहेत. रुग्णालयात आलेल्या रुग्णांची गैरसोय होत नाही.

तसेच उपजिल्हा रुग्णालयात ०१ वैद्यकीय अधीक्षक व ०७ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी ०१ वैद्यकीय अधीक्षक व ०४ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत. सदर ०४ वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये ०१ वैद्यकीय अधिकारी (बालरोगतज्ज्ञ) व ०१ वैद्यकीय अधिकारी (भूलतज्ज्ञाचा) समावेश आहे.

(२) सदर उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोगतज्ज्ञ) हे पद रिक्त असून ०१ वैद्यकीय अधिकारी (बालरोगतज्ज्ञ) व ०१ वैद्यकीय अधिकारी (भूलतज्ज्ञ) यांची पदे भरलेली आहेत.

अतिजोखमीचे रूग्ण असल्यास त्यांना तातडीने प्रथम उपचारानंतर छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) यांच्याकडे संदर्भीत करण्यात येतात.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (वेतनस्तर एस-२०) यांची एमबीबीएस तसेच विशेषज्ञ मधील एकूण १४४० रिक्त पदांची जाहिरात दिनांक २७/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये 'विशाखा' व 'पॉश' समित्या प्रभावीपणे कार्यरत नसल्याबाबत

**(३७) * ९६१० श्री.सत्यजीत तांबे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्रीमती भावना गवळी, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) च्या अलीकडील वार्षिक अहवालानुसार महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींमध्ये पाचपट वाढ झाली असून नाशिकमधील एका खाजगी कंपनीत महिलांच्या शोषणाचे 'कॉर्पोरेट जिहाद' सारखे प्रकरण निदर्शनास आले असून महिला सुरक्षेसाठी बंधनकारक असलेल्या 'विशाखा' व 'पॉश' (POSH) समित्या या प्रभावीपणे कार्यरत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्यानुसार (पॉश ॲक्ट) सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक असतानाही अनेक कार्यालयांमध्ये अशा समित्या अस्तित्वात नसणे, समित्यांचे प्रभावी कार्य न होणे, प्रशिक्षणाचा अभाव, वार्षिक अहवाल सादर न करणे, समित्यांचे फलक न लावणे, तक्रारीचा निकाल ९० दिवसांत देण्याचे कायदेशीर बंधन असतानाही त्याचे पालन न करणे, महिला सुरक्षा नियमांचे सर्रास उल्लंघन इत्यादी त्रुटी आढळून आल्या असून त्यामुळे अशा सर्व कार्यालयांमध्ये महिलांच्या छळाचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगामार्फत सर्व शासकीय व खाजगी कार्यालयांचे 'पॉश ऑडिट करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवून राज्यातील सर्व आस्थापनांमध्ये या समित्या सक्रिय करण्यासाठी तसेच या समित्यांना अधिक अधिकार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) प्रश्नात उल्लेखित टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) च्या अलीकडील वार्षिक अहवालानुसार महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींमध्ये पाचपट वाढ आहे ही बाब वस्तुस्थितीवर आधारित नाही.

सदर कंपनीच्या POSH समितीकडे या ॲक्ट अंतर्गत एकही तक्रार प्राप्त नसल्याचे चौकशीत आढळून आले आहे.

(२), (३) व (४) Posh Act, २०१३ मधील कलम २५ नुसार अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने शासन परिपत्रक दिनांक १४ मे, २०२६ नुसार १२ संवर्गातील अधिकाऱ्यांना तपासणी अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे. या तपासणी अधिकाऱ्यांचे प्रत्येक जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण भागातील तपासणीसाठी क्षेत्र व उद्दिष्ट निश्चित करून देण्यात आले आहे.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) प्रकरणी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नाशिक यांचे पथकाने दिनांक १०/०४/२०२६ रोजी चौकशी केली. सदर आस्थापनेस पॉश ॲक्ट २०१३ अंतर्गत नियुक्त जिल्हा अधिकारी, नाशिक यांनी कारणे दाखवा नोटीस दिली असून अधिनियमातील तरतूदीनुसार रुपये ५०,०००/- दंड करण्यात आला आहे.

Posh Act, २०१३ हा केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असून त्यामधील बदलाबाबतच्या सूचना/ शिफारशी केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतात. कार्यस्थळी महिलांसाठी सुरक्षित, सन्मानजनक व भेदभावमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी शासनामार्फत आवश्यक ती कार्यवाही सातत्याने करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागांतर्गतच्या औद्योगिक क्षेत्रांतील भूखंडांवर औद्योगिक उत्पादन सुरु केले नसल्याबाबत

**(३८) * ८६९८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागांतर्गत येणाऱ्या नागपूर, भंडारा, गोंदिया आणि वर्धा या चार जिल्ह्यांमधील ३४ औद्योगिक क्षेत्रांतील ३०१ भूखंडांवर उत्पादन किंवा बांधकाम सुरू नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगणा आणि बुटीबोरी यांसारख्या प्रमुख औद्योगिक क्षेत्रांमध्ये अनेक वर्षांपासून उद्योग उभारणीकरीता वितरीत केलेल्या भूखंडावर उद्योग उभे न राहिल्याने सुमारे ४११ एकर जमीन विनावापर पडून असल्याने नविन उद्योजकांसाठी जमीन उपलब्ध होत नसल्याने नागपूरच्या औद्योगिक विकासात अडथळे निर्माण होत आहे व स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होत नसल्याने येथील तरुणांना नोकरीसाठी पुणे, मुंबई किंवा परराज्यात स्थलांतर व्हावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या धोरणांनुसार औद्योगिक क्षेत्रांमधील भूखंड परस्पर विकणे किंवा भाडेतत्त्वावर देणे यावर कायदेशीर बंदी असतानाही काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत व्यवहार होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर येथील औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रामध्ये भूखंड प्राप्त झाले असतानाही युनिट न सुरू करणाऱ्या किती उद्योजकांवर आतापर्यंत कारवाई करण्यात आली तसेच उक्त भूखंड औद्योगिक विकास महामंडळाने पुन्हा आपल्या ताब्यात घेतल्यानंतर नवीन व गरजू उद्योजकांना युनिट सुरू करण्यासाठी किती कालावधीत सदरचे भूखंड वाटप करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

नागपूर,वर्धा,गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये वाटप करण्यात आलेल्या भूखंडापैकी ३०१ भूखंडांवर बांधकाम करण्यात आले असून भूखंडधारकाच्या आर्थिक परिस्थिती, न्यायालयीन प्रकरण तसेच इतर कारणास्तव उद्योग घटक बंद आहेत. सदरहू उद्योग घटक सुरु करण्याबाबत धारक कंपनीस म.औ.वि. महामंडळामार्फत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

(२) नागपूर विभागातील हिंगणा आणि बुटीबोरी या औद्योगिक क्षेत्रातील वाटप करण्यात आलेल्या एकूण १५३ भूखंडावरील उद्योग घटक बंद असून त्याचे क्षेत्र २७० एकर आहे. त्यापैकी हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील एकूण ९ भूखंड परत घेण्यात आलेले आहेत.

तसेच बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील एकूण ३० भूखंड परत घेण्यात आलेले असून, सदरहू भूखंड वाटप करण्याकरीता म.औ.वि. महामंडळाच्या Milaap Portal उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. उर्वरित भूखंडावरील उद्योग घटक सुरु करण्याबाबत धारक कंपनीस नोटीस बजावण्यात आलेल्या असून, म.औ.वि. महामंडळाच्या धोरणानुसार अविकसित भूखंड परत घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

म.औ.वि. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड परस्पर विकण्याचे कोणतेही धोरण नाही. तथापि, धारक कंपनीने म.औ.वि. महामंडळास भूखंड हस्तांतरण करुन देण्याबाबत अथवा भाडेतत्वावर देण्याबाबत विनंती केल्यास म.औ.वि. महामंडळाच्या धोरणानुसार मंजूरी देण्यात येते.

(४) नागपूर, वर्धा, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामधील बंद असलेल्या ३०१ भूखंडावरील धारक कंपन्यास नियमानुसार रितसर नोटीस बजावण्यात आलेल्या असून, ३९ भूखंड परत घेण्यात आलेले आहेत. सदरहू भूखंड गरजू उद्योजकांना वाटप करण्याकरीता Milaap Portal उपलब्ध करुन देण्यात आले असून, सदर पोर्टलवर भूखंडाकरीता अर्ज प्राप्त झाल्यास सदर भूखंडांचे वाटप करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भाईंदर येथील पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात मुदतबाह्य औषधांचा पुरवठा करण्यात येत असल्याबाबत

**(३९) * ८८९६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) येथील पंडित भीमसेन जोशी (टेंबा) रुग्णालयात ४८ तासात मुदत बाह्य होणारी रुपये १कोटी, ६५ लाखांची औषधे सक्षम फाउंडेशनमार्फत जबरदस्तीने पुरविण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सक्षम फाउंडेशनविरुध्द गुन्हा नोंदवून तात्काळ पंचनामा करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश परिवहन मंत्र्यांनी देऊनही याप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंडित भीमसेन जोशी (टेंबा) रुग्णालयात दीड कोटींची मुदतबाह्य औषधे पुरविणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

सक्षम फाऊंडेशन, भाईंदर (पूर्व) या संस्थेकडून सीएसआर फंडामार्फत पंडित भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर या रुग्णालयास रुग्णालयाची कोणतीही लेखी मागणी नसताना व किंमतीची पूर्वकल्पना न देता देणगी स्वरुपात रुपये १,६४,२४,०००/- एवढ्या रक्कमेची औषधे व उपचारात्मक साहित्य देण्यात आले होते.

सदर औषधे व साहित्यांची पडताळणी केली असता, त्यामध्ये रुपये ३,५८,४४६/- एवढया रकमेची मुदतबाहय झालेले व रुपये ४७,३६,४८४/- एवढया रकमेची मुदतबाहय होत असलेले (माहे एप्रिल ते जून २०२६) व रुग्णालयात वापरात न येणारे साहित्य आढळून आले होते.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणात जिल्हा शल्य चिकित्सक/ वैद्यकीय अधीक्षक, पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर यांचेमार्फत वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिरा-भाईंदर पोलीस स्टेशन भाईंदर यांच्याकडे दिनांक २४/०४/२०२६ व दिनांक २९/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सक्षम फाऊंडेशन, भाईंदर (पूर्व) यांच्याविरुध्द एफ.आय.आर. नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिरा-भाईंदर यांच्यामार्फत पुढील चौकशी/ तपासाची कार्यवाही सुरू आहे.

(३) पंडीत भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईन्दर रूग्णालयाने सदर साहित्याचा वापर केलेला नाही. तसेच, प्राप्त साठ्यामध्ये मुदतबाह्य झालेल्या व जवळील मुदतबाह्य दिनांकाचा साठा असल्याचे आढळून आल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधीक्षक, पं.भी.जोशी सा.रुग्णालय, मिरा भाईंदर यांनी दिनांक ३०/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर साहित्य परत घेण्याबाबत सक्षम फाऊंडेशन, भाईंदर (पूर्व) या संस्थेस कळविले होते. त्यानुसार सदर संस्थेने दिनांक १८/०४/२०२६ व दिनांक २२/०४/२०२६ रोजी मुदतबाहय व मुदतबाह्य होत असलेल्या औषधे व उपचारात्मक साहित्याचा साठा परत नेलेला असून सध्या सदर रुग्णालयात कोणतेही मुदतबाहय झालेला उपचारात्मक साहित्यसाठा उपलब्ध नाही.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे औषध निरीक्षकांनी दिनांक २५/०४/२०२६ रोजी याबाबत चौकशी केलेली असून सदर औषधी-साहित्यातील नमुने चाचणीसाठी नेलेले असून त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

सक्षम फाऊंडेशन, भाईंदर (पूर्व) यांच्याविरुध्द मुदतबाह्य औषधी व उपचारात्मक साहित्य रुग्णालयास पुरविल्या प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक/ वैद्यकीय अधीक्षक, पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर यांचेमार्फत एफ.आय.आर. नोंदविण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिरा-भाईंदर यांना कळविण्यात आलेले असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिरा-भाईंदर यांच्यामार्फत पुढील चौकशी/ तपासाची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा रुग्णालयात दिव्यांगांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४०) * ८९३६ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा रुग्णालयात पुणे व पिंपरी-चिंचवड शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातून दिव्यांगत्व प्रमाणपत्र तसेच विविध उपचारांसाठी येणाऱ्या दिव्यांगांची संख्या मोठी असल्याने त्यांच्या गरजा लक्षात घेऊन रुग्णालय परिसरात उभारण्यात आलेल्या विशेष सुगम्य स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली असून तेथील घाणीचे साम्राज्य, अस्वच्छता व दुर्गंधीमुळे दिव्यांगांची गैरसोय होत असून तिथे त्यांना प्रवेश करणेदेखील कठीण झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुगम्य भारत अभियानांतर्गत व्हीलचेअर प्रवेशासाठी रॅम्प, रुंद दरवाजे, पकडण्यासाठी दांडे, योग्य उंचीचे कमोड, आपत्कालीन सुरक्षा घंटी, तसेच स्वच्छता व पाण्याची पुरेशी सोय अपेक्षित व आवश्यक असताना व स्वच्छ भारत व स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत अशा सुविधांवर विशेष भर दिला जात असतानाही जिल्हा रुग्णालयाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दिव्यांगांची गैरसोय टाळण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) जिल्हा रुग्णालयामध्ये तळमजल्यावर दिव्यांगांकरीता स्वच्छता गृह उपलब्ध आहे. सदरचे स्वच्छता गृह हे दुरुस्तीकरीता माहे एप्रिल २०२६ च्या दरम्यान बंद ठेवण्यात आलेले होते. त्यादरम्यान स्वच्छता गृह अस्वच्छ असल्याबाबतची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात दुरुस्ती करीता सदरचे स्वच्छता गृह बंद ठेवण्यात आल्याबाबतची सुचना स्वच्छता गृहावर लावण्यात आलेली होती. सद्य:स्थितीमध्ये दुरुस्त करण्यात आलेले स्वच्छता गृह सुस्थितीमध्ये दिव्यांगांकरीता खुले करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही,

सुगम्य भारत अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालय, पुणे या रुग्णालयामध्ये दिव्यांगांकरीता मुख्य प्रवेशव्दारावर व्हीलचेअर ठेवण्यात आलेली असून प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजूस रॅम्प व रुंद दरवाजे उपलब्ध आहेत. रॅम्पवरुन जाताना व येताना आधाराकरीता स्टीलचा रॉड उपलब्ध आहे. तसेच स्वच्छता गृहामध्ये उंचीचे कमोड, आपत्कालीन सुरक्षा घंटी व स्वच्छता गृहामध्ये पुरेशा व मुबलक प्रमाणात पाण्याची सोय उपलब्ध आहे.
(३) दिव्यांगाकरीता आवश्यक सर्व उपाययोजना जिल्हा रुग्णालयामध्ये उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किनगाव व वरणगाव (जि.जळगाव) येथील ग्रामीण रुग्णालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४१) * ९५५२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनगाव (ता.यावल, जि.जळगाव) येथील ग्रामीण रुग्णालयाचे लोकार्पण होऊन दोन वर्षांचा कालावधी होवूनही अद्याप सदरहू रुग्णालय सुरळीतपणे सुरू झाले नाही तसेच वरणगाव (जि.जळगाव) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी यांची कमतरता असल्याने आरोग्य सेवेवर परिणाम होऊन रुग्णालयीन सेवा बंद झाल्याची बाब दिनांक १० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही रूग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णांना रुग्णसेवा देताना अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किनगाव व वरणगाव (जि.जळगाव) येथील ग्रामीण रुग्णालयांतील रिक्त पदे तातडीने भरून सदर रुग्णालये सुरू करुन रुग्णसेवा सुरळीत करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

(२) ग्रामीण रुग्णालय, किनगाव येथे १० नियमित पदे मंजूर आहेत. सदरचे ग्रामीण रुग्णालय, पूर्ण क्षमतेने सुरु करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक, जळगांव यांनी इतर संस्थांमधुन वैद्यकीय अधीक्षक ०१, अधिपरिचारीका ०३ पदे आणि गट-ड ची ०५ पदे इतर संस्थांमधुन वर्ग केलेली आहेत.

तर ग्रामीण रुग्णालय, वरणगाव येथे गट-अ ते गट-ड ची २८ पदे मंजूर असून १५ पदे भरलेली आहेत. उपलब्ध पदांमधून सदर रुग्णालयात रुग्णांना रुग्ण सेवा देण्यात येत आहे

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (वेतनस्तर एस-२०) यांची एमबीबीएस तसेच विशेषज्ञ मधील एकूण १४४० रिक्त पदांची जाहिरात दिनांक २७/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड सुरक्षा मंडळातील नोंदणीकृत सुरक्षा रक्षक नियुक्तीपासून वंचित असल्याबाबत

**(४२) * ९३७१ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्षेत्रे, कंपन्या, व्यावसायिक संकुले व गृहनिर्माण सोसायट्या अस्तित्वात असून रायगड सुरक्षारक्षक मंडळाकडे नोंदणीकृत एकूण ५७०० हून अधिक सुरक्षा रक्षक असताना त्यापैकी केवळ १९५९ रक्षकांनाच नोकरी उपलब्ध झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित सुमारे ३७०० पेक्षा अधिक नोंदणीकृत सुरक्षा रक्षक अद्याप बेरोजगार असून त्या ठिकाणी नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना नोकऱ्या न मिळता खाजगी एजन्सीमार्फत मंडळाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने इतर राज्यांतील व्यक्तींना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात एकूण कंपन्यांची संख्या किती आहे व संबंधित कंपन्या व संस्थांकडून स्थानिक नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना नोकरी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मागील पाच वर्षात किती कंपन्यासमवेत करार केला आहे,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरक्षा रक्षकांसाठी जागा उपलब्ध असतानाही नोंदणीकृत सुरक्षा रक्षक बेरोजगार राहत असल्याने सदर प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) अशा स्वरुपाची मा.लोकप्रतिनिधींची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत हे खरे आहे.

(२), (३) व (४) रायगड जिल्ह्यामध्ये एकूण १० औद्योगिक क्षेत्रे आहेत.

कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत एकूण १९३३ कारखाने औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडे नोंदीत असून, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७ अंतर्गत २० पेक्षा जास्त कामगार संख्या असलेल्या एकूण १३० आस्थापना नोंदीत आहेत.

परंतु गृहनिर्माण संस्थांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या तरतूदी लागू होत नाहीत.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सध्या एकूण ४६०४ सुरक्षा रक्षक नोंदीत असून, त्यापैकी सध्या २०७३ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत व २५३१ सुरक्षा रक्षक प्रतिक्षायादीवर आहेत.

सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सुरक्षा रक्षकांची नोंदणी करताना अधिवास प्रमाणपत्र बंधनकारक असल्याने शक्यतो राज्याबाहेरील सुरक्षा रक्षक मंडळात नोंदीत होत नाहीत. परंतु खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमध्ये राज्यातील व राज्याबाहेरील सुरक्षा रक्षक सदर एजन्सीमार्फत नियुक्त करण्यात येतात. परंतु त्यांच्या नियुक्त्या मंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने करण्यात येतात, अशी वस्तुस्थिती नाही.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ चे मुख्य उद्दीष्ट, "सुरक्षा रक्षकांचे कल्याण तसेच कल्याणकारी योजना राबविणे हे आहे." त्या अनुषंगाने कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी या दृष्टीकोनातून मंडळामार्फत मागील पाच वर्षात सुमारे ४१९ इतक्या आस्थापनांना भेटी देऊन निरीक्षण शेरे पारित करण्यात आलेले असून, अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन करणाऱ्या सुमारे १२० इतक्या आस्थापनांविरुध्द खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच शासन स्तरावर याबाबत वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने प्रतिक्षायादीवरील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या तातडीने नियुक्ती होण्याच्या दृष्टीकोनातून शासनामार्फत विशेष मोहीम पथक स्थापन करण्यात आले असून त्या अन्वये पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच याच प्रकरणी दिनांक २०/०५/२०२६ रोजी शासन स्तरावर बैठक संपन्न झाली असून रायगड मंडळाच्या कार्यक्षेत्रातील तालुकानिहाय विशेष मोहीम राबविण्याबाबत संबंधितांना आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## थेरगाव-चाकण (जि.पुणे) आणि कराड (जि.सातारा) येथील प्रयोगशाळांनी कारखान्यांतील कामगारांच्या रक्त तपासणीचे बनावट अहवाल दिल्याबाबत

**(४३) * ९३८४ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थेरगाव-चाकण (जि.पुणे) आणि कराड (जि.सातारा) येथील काही प्रयोगशाळांनी (Labs) NABL (नॅशनल ॲक्रेडिटेशन बोर्ड फॉर टेस्टिंग ॲण्ड कॅलिब्रेशन लॅबोरेटरीज) च्या नियमांचे उल्लंघन करून कारखान्यांतील कामगारांच्या रक्त तपासणीचे बनावट अहवाल दिल्याची गंभीर बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार कारखान्यांतील कामगारांची प्रत्येक वर्षी आरोग्य तपासणी करणे अनिवार्य असतानाही शासकीय ऑडिट आणि कामगार विभागाच्या कारवाईपासून वाचण्यासाठी लॅब चालकांनी कंपन्यांशी संगनमत करुन अनेक कामगारांच्या रक्ताचे नमुने न घेता किंवा चाचण्या न करताच, संगणकावर परस्पर 'फिटनेस रिपोर्ट' तयार करुन दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून बनावट अहवाल देणाऱ्या सदरील प्रयोगशाळा चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे काय, असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार संचालक, औद्योगीक सुरक्षा व आरोग्य, औद्योगीक सुरक्षा व आरोग्य संचालनालय तसेच महाराष्ट्र परावैद्यक परिषद यांचेकडे प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील ग्रीड प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(४४) * ९६४८ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) विधानसभा मतदार संघातील १८२ गावांना शुध्द पाणी मिळावे यासाठी शासनाकडून जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ७२८ कोटी ९० लाख ८१ हजार रुपयांची मंजूर करण्यात आलेली ग्रीड प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अद्यापही कार्यान्वित झालेली नसल्यामुळे अनेक गावांना शुध्द पाण्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मूळ नियोजनानुसार हे काम सन २०२४ पर्यंत पूर्ण होऊन प्रत्येक गावातील नागरिकांना शुध्द व फिल्टर केलेले पाणी मिळणे अपेक्षित असताना मात्र, प्रशासकीय दिरंगाई आणि संथ कामांमुळे सदर योजना अद्यापही कार्यान्वित झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त १८२ गावांना शुध्द पाणीपुरवठा करण्याकरीता सदर योजना त्वरीत कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

१८२ गावे ग्रीड पाणीपुरवठा योजनेत अर्धापूर तालुक्यातील ५१, मुदखेड तालुक्यातील ४९ व भोकर तालुक्यातील ८२ गावांचा समावेश आहे. सदरील गावांना अस्तित्वातील स्त्रोतातुन पाणीपुरवठा होत असून सदर योजनेचे माहे एप्रिल २०२६ अखेर भौतिकदृष्टया ७१.४५% काम पूर्ण झाले आहे. योजनेत समाविष्ट गावांपैकी भोकर तालुक्यातील जाकापूर व जाकापूर तांडा येथे पाणी टंचाई उपाययोजना अंतर्गत जिल्हा परिषद नांदेड मार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

मूळ मंजूर निवदेनुसार योजनेचे काम माहे ऑक्टोंबर २०२४ अखेर पूर्ण करणे अपेक्षित होते. तथापि, विविध खात्याकडून आवश्यक असलेल्या जागा/ परवानग्या मिळण्यास विलंब झाल्यामुळे योजना कार्यान्वित करण्यास विलंब होत आहे. तसेच जल जीवन मिशन अंतर्गत निधीच्या कमतरतेमुळेही योजनेची कामे पूर्ण करण्यास विलंब होत असून सदर योजनेच्या कामास माहे जुलै-२०२६ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) व (४) सदर योजनेतील जल शुध्दीकरण केंद्रासह इतर उपांगाच्या जागेत बदल झाल्यामुळे व विविध विभागाकडून आवश्यक असलेल्या जागा/ परवानग्या मिळण्यास विलंब/ उद्धवाच्या कामास स्थानिक लोकांकडून विरोध झाल्यामुळे योजना कार्यान्वित करण्यास विलंब होत आहे. तथापि, सदर प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून समन्वय साधून व स्थानिक नागरिकांचा वाद मिटवून पुन:श्च कामास सुरुवात करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेची कामे सद्य:स्थितीत प्रगतीपथावर असून माहे डिसेंबर, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## कळंब व करचुंडे (ता.सुधागड, जि.रायगड) येथील आदिवासी वाड्यांकरीता रस्ता मंजूर करण्याबाबत

**(४५) * १०१०८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब व करचुंडे (ता.सुधागड, जि.रायगड) येथील आदिवासी वाड्यांमध्ये स्थानिक नागरिकांना जाणे-येण्यासाठी अद्याप पक्का रस्ता उपलब्ध नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्याला प्रदीर्घ काळ पूर्ण झाल्यानंतरही या आदिवासी वाड्यांमध्ये रस्त्यांची मूलभूत सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे आरोग्य आणीबाणीच्या प्रसंगी तसेच पावसाळ्यात स्थानिक नागरिकांचे प्रचंड हाल होत असल्यामुळे येथील स्थानिकांमध्ये तीव्र असंतोष व नाराजीचे वातावरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वाड्यांची व रस्ते मार्गाची संबंधित प्रशासनाने किंवा सार्वजनिक बांधकाम/ग्रामविकास विभागाने पाहणी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर आदिवासी बांधवांसाठी प्राधान्यक्रमाने रस्ता मंजूर करून तो तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) हे खरे नाही.

कळंब व करचुंडे येथील आदिवासी वाड्यांमध्ये प्रधान मंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत २ कामे, पॅकेज क्र. MH२४८६- प्रजिमा ३८ ते करचुंडे कातकर वाडी रस्ता,ता.सुधागड (लांबी १.०० कि.मी.) आणि पॅकेज क्र. MH२४१०६ कळंब ठाकूरवाडी पूल ते कौळोशी कातकरवाडी रस्ता, ता.सुधागड (लांबी १.०२ कि.मी) मंजूर करण्यात आली असून सदरची कामे प्रगतीत आहेत.

(३) शेतकऱ्यांच्या अडचणी, काही ग्रामस्थांच्या विरोधामुळे सदर मंजूर २ कामे पूर्ण करण्यासाठी विलंब होत असून सदर अडचणी दूर करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, रायगड यांच्या स्तरावरुन सुरु असून अडचणी दूर करुन सदरची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गांधीनगर नळ पाणीपुरवठा योजना अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४६) * १०४६४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पाचगाव, उचगाव, वळीवडे व इतर १३ गावांसाठी सन २०२२ मध्ये मंजूर करण्यात आलेली गांधीनगर नळ पाणीपुरवठा योजना मंजूर होवूनही या योजनेतील टाक्या वितरण व्यवस्था अपूर्ण असल्याने सदरहू योजना प्रलंबित असल्याने उक्त १३ गावांतील ग्रामस्थ व महिलांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयावर घागर मोर्चा काढून निषेध व्यक्त केल्याचे दिनांक ८ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करून सदरील नळ पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर घागर मोर्च्याच्या अनुषंगाने ठेकेदारांकडून जून २०२७ पर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे लेखी नियोजन घेण्यात आले असून त्यानुसार प्रशासकीय पातळीवरुन वेळोवेळी आढावा घेऊन पाठपुरावा करण्यात येत आहे. निविदा अटी व शर्तींनुसार ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून परदेशी वैद्यकीय पदवीधर विद्यार्थ्यांच्या नोंदणी प्रक्रियेत विलंब होत असल्याबाबत

**(४७) * ९२८६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थी परदेशात शिक्षण घेऊन आल्यानंतर त्यांना भारतात परदेशी वैद्यकीय पदवीधर परीक्षेसाठी (Foreign Medical Graduates - FMGs) नोंदणी करावी लागत आहे परंतु नॅशनल मेडिकल कमिशनच्या (NMC) नियमांनुसार पात्रता असूनही, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून आवश्यक प्रक्रिया पूर्ण न झाल्याने नोंदणी प्रक्रियेतील विलंबामुळे हे विद्यार्थी परदेशी वैद्यकीय पदवीधर परीक्षा (FMGE) जून, २०२६ पासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून (एमएमसी) कायमस्वरूपी नोंदणीबाबत स्पष्ट निर्देश मिळत नसल्याने सुमारे दोन हजारांहून अधिक विद्यार्थी नोंदणी प्रतिक्षेत असून परदेशात सर्व निकष पूर्ण करूनही नोंदणी मिळत नसल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया सुरुळीत होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशतः खरे आहे. राज्यातील विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर त्यांना परदेशी वैद्यकीय पदवीधर परीक्षा (Foreign Medical Graduates Examination) उत्तीर्ण होणे आवश्यक असते. सदर परीक्षा राष्ट्रीय परीक्षा मंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत दरवर्षी जून व डिसेंबर महिन्यात आयोजित केली जाते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे तात्पुरत्या अथवा कायमस्वरूपी नोंदणीसाठी अर्ज करू शकतात. नोंदणी प्रक्रियेत प्रक्रियेतील पडताळणीस लागणाऱ्या कालावधीमुळे विलंब होतो.
(२) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाची स्वतंत्र व सविस्तर पडताळणी करण्यात येते. परदेशी वैद्यकीय पदवीधरांना नोंदणी देण्यापूर्वी राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (National Medical Commission), माजी भारतीय वैद्यकीय परिषद (Medical Council of India) यांच्या नियमावली, सार्वजनिक सूचना, परिपत्रके व लागू असलेल्या वैधानिक तरतुदींनुसार खालील कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक असते. पडताळण्यादरम्यान बाह्य प्राधिकरणांकडून प्राप्त होणाऱ्या अहवालांवर अवलंबून असल्याने नोंदणी प्रक्रियेस काही कालावधी लागू शकतो. तसेच, Foreign Medical Graduates यांना तात्पुरती व कायमस्वरूपी नोंदणी देताना खालील नियम व कायदेशीर तरतुदी लागू होतात :

१. Medical Council of India Screening Test Regulations, २००२

२. National Medical Commission Foreign Medical Graduate Licentiate Regulations, २०२१

३. Eligibility Requirement for Admission in Foreign Medical Institutions Regulations, २००२

४. Compulsory Rotating Medical Internship Regulations, २०२१

५. National Medical Commission Act, २०१९

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या वेळोवेळी निर्गमित सूचनांनुसार ऑनलाइन शिक्षणाच्या बदल्यात आवश्यक प्रत्यक्ष प्रशिक्षण (Onsite Compensation) पूर्ण झाले आहे किंवा नाही याचीही पडताळणी करण्यात येते. तद्नंतर एक किंवा दोन वर्षांची आंतरवासियता (Internship) पूर्ण करणे बंधनकारक ठरते
(३) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही, तथापी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. आवश्यक पडताळणी प्रलंबित असली तरी “Subject to Verification of Embassy and Board” या अटीस अधीन राहून तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

२. १०+२ Board Verification, FMG Screening Test Verification, Embassy Verification आणि University Verification या प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने राबविण्यात येत आहेत.

त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या नोंदणी प्रक्रियेत अनावश्यक विलंब होऊ नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उत्तमसरा (ता.भातकुली, जि.अमरावती) ग्रामपंचायतीच्या विकासकामांच्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४८) * १०५२५ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तमसरा (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे सन २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा परिसरातील क्रीडांगण बांधकाम, १५ वा वित्त आयोग निधीतील कामे, तसेच इतर विकासकामांमध्ये प्रत्यक्षात कामे न करता त्यांची देयके काढण्यात आल्याने सदर विकासकामांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याची तक्रार प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित तक्रारीनुसार ग्रामपंचायत निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला असून या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे काय तसेच ग्रामपंचायत हद्दीतील नवीन ले-आऊट विकासात मूलभूत सुविधा न पुरवता व विकास शुल्क न भरता प्लॉट विक्री झाली आहे त्याचप्रमाणे उत्तमसरा येथील विकासकामांच्या घोटाळ्यासोबतच, शासकीय शाळेतील काही कर्मचाऱ्यांकडून नियमबाह्य पध्दतीने घरभाडे भत्ता (HRA) घेत असल्याचा प्रकार निदर्शनास आल्याबाबत चौकशीची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची तांत्रिक, प्रशासकीय व लेखा विषयक सखोल चौकशी करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे काय, तसेच चौकशीदरम्यान तक्रारदारास उपस्थित राहण्याची संधी देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशीअंती काय आढळून आले त्यानुसार दोषी पदाधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारांवर कारवाई करून व झालेल्या अनियमित खर्चाची वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) जि.प. माध्यमिक शाळा परिसरातील क्रीडांगण बांधकाम अनियमितता संदर्भात गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भातकुली यांचे स्तरावरुन सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आलेली होती, परंतु तक्रारकर्ते यांना चौकशी अहवाल अमान्य असल्याने चौकशी करण्याबाबत पंचायत समिती भातकुली यांचे कडे नव्याने निवेदन सादर केले होते. सबब चौकशीची मागणी करण्यात आली आहे. हे खरे आहे.
(३) होय, तक्रारदार यांनी उपस्थित केलेल्या इतर मुद्यांबाबत गटविकास अधिकारी यांचे स्तरावर चौकशी करण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणी तक्रारदार यांनी केलेल्या उपोषणाची सांगता करतांना तक्रारकर्ते यांचे मागणी नुसार जिल्हा परिषद कार्यालयाचे आदेश क्रमांक पंचायत / तक्रार /१३९५ दिनांक २३/०४/२०२६ अन्वये नव्याने जिल्हास्तरीय सात सदस्यांची चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्याचे आदेशित करण्यात आले. त्यानुसार समितीव्दारे चौकशी करीता तक्रारदार यांना उपस्थित राहण्याकरीता कळविलेले असता ते प्रत्यक्ष उपस्थित राहीलेले असून त्यांनी बयान सुध्दा नोंदविलेले आहे. सबब तक्रारदार यांना उपस्थित राहण्याची संधी देण्यात आली आहे.

(४) जिल्हा स्तरावरुन सदर प्रकरणी चौकशी करण्याकरीता नेमण्यात आलेल्या सात सदस्यीय समिती व्दारे दिनांक १८/०६/२०२६ ला सविस्तर चौकशी अहवाल प्राप्त झाला असून चौकशी अहवालातील अंतिम निष्कार्षामध्ये नमुद १ ते ११ निष्कार्षाबाबत जिल्हा स्तरावरुन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागातील पाणीटंचाई दूर करण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४९) * ९५६९ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, अंबरनाथ, कल्याण, भिवंडी आणि पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा यांच्यासारख्या दुर्गम भागातील शेकडो गावांना सध्या तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार आणि शहापूर तालुक्यात काही गावांमध्ये माहे डिसेंबर महिन्यापासूनच टँकरव्दारे पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भावली धरण योजनेचे काम तातडीने पूर्ण करुन प्रश्न भाग-१ मध्ये नमुद केलेल्या गावांना त्यातून पुरेशा पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहापुर तालुका हा पूर्णपणे आदिवासी बहुल आहे. या तालुक्यातील राहणारी लोकसंख्या ही डोंगरी उंचभागावर राहते. सदर परिसराची भुस्तरीय रचना दख्खन पठाराचा भाग व बेसॉल्ट या कठिण खडकांचा भाग असल्याने सदर भूजल स्तरांची घट ही उन्हाळयात अतिशीघ्र होते. परिणामी भुजलावर आधारित असलेले उद्धव उदा. विहरी व विंधन विहीर हे हंगामी स्वरुपाचे आहेत. पावसाळयात या तालुक्यात भरपुर पाऊस पडूनही माहे जानेवारी अखेर पासून पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असते. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील शहापुर व मुरबाड तालुक्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. सद्य:स्थितीत शहापुर तालुक्यातील पाणी टंचाई क्षेत्रातील १७८ ग़ाव-पाड्यांना ४४ टँकरद्वारे तसेच मुरबाड तालुक्यातील १६ ग़ाव-पाड्यांना ३ टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेत येत आहे.

पालघर जिल्ह्यातील जव्हार व मोखाडा या तालुक्यांतील भुपृष्ठ रचना खडकाळ असल्याने या भागात पाणी धारण क्षमता अत्यंत अल्प आहे. त्यामुळे भुजल पातळी खाली गेल्याने पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

सद्य:स्थितीत जव्हार तालुक्यातील पाणी टंचाई क्षेत्रातील ५३ ग़ाव-पाड्यांना २० टँकरद्वारे तसेच मोखाडा तालुक्यातील ३८ ग़ाव-पाड्यांना ११ टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेत येत आहे.
(२) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात दिनांक ०४ जानेवारी, २०२६ रोजी टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

ठाणे जिल्हांतर्गत शहापुर तालुक्यामध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरु करणेत आला आहे.
(३) शहापुर तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त ९७ गावे व २५९ पाड्यांसाठी पाणी टंचाई कायमस्वरुपी सोडविण्यासाठी भावली धरण उदभवातुन गुरुत्वाकर्षण पध्दतीने प्रादेशिक योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत प्रगतीपथावर आहे. सदर योजनेची भौतीक प्रगती ७०% इतकी असून माहे डिसेंबर, २०२८ पर्यंत योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर त्यावर अवलंबून असणाऱ्या जिल्हा परिषद मार्फत करण्यात येणाऱ्या अंतर्गत पाणी योजना कार्यान्वित होतील.

जिल्हा परिषदेकडून करण्यात येणाऱ्या भावली पाणी योजनेवर अवलंबून असणाऱ्या योजनांपैकी सुमारे १६ अंतर्गत योजना अन्य स्त्रोतांवरुन तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित करण्यात येत असून, त्यापैकी ११ ठिकाणी पाणीपुरवठा सुरु करणेत आलेला आहे. तसेच भावली स्त्रोतावरील योजना पूर्ण झाल्यानंतर सर्व प्रस्तावित योजना नियमित सुरळीत चालू होऊन पाणी टंचाई शाश्वत दूर होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा जलसंधारण अधिकारी, सोलापूर यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(५०) * ९०२२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर यांनी गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेच्या कामासाठी संस्थाची निवड करतांना अनुभव नसणाऱ्या २० संस्थांची निवड करुन प्रत्येक संस्थेकडून संस्था निवडीसाठी प्रत्येकी १० लाख रुपये घेऊन जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेतल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवड केलेल्या २० संस्थांपैकी ७ संस्थांना कोणत्याही प्रशासकीय कामांचा अनुभव नसतानाही तसेच शासन नियमानुसार सदर ११ संस्थाकडे आवश्यक जीएसटी प्रमाणपत्र नसतानाही त्यांना शासनाच्या १८ टक्के जीएसटी रकमेची वाटप करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेमध्ये एका कामासाठी एकच स्वयंसेवी संस्थेची निवड करणे बंधनकारक असतानाही एकाच व्यक्तीच्या मंगळवेढा तालुकयातील चार संस्थांना कोणताही अनुभव नसताना किंवा कोणतीही कामे केलेली नसतानाही कामे देण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेमार्फत जिल्हा परिषद, सोलापूर, जलसंपदा विभाग व कृषी विभाग यांनी २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये त्याच तलावातील गाळ मोठ्या प्रमाणात काढला असून काही तलावांमध्ये एकाच कामासाठी तीन ते चार संस्था दाखवण्यात येऊन गाळ न काढता त्या संस्थेच्या मापन

पुस्तिका तयार करुन त्यांना करोडो रुपये देण्यात आल्याचे तसेच अभिनव भारत समाजसेवा मंडळ, सालसे, तालुका करमाळा या संस्थेला जवळपास ८ ते ९ गावांतील कामे देण्यात आली असून त्याकरीता रक्कम रुपये १,८१,३९,४०३/- एवढे अनुदान देण्यात येऊन संस्थेने मापन पुस्तिकेत जवळपास ३०५०९९२ घनमीटर एवढा जादा गाळ टाकल्याच्या खोटया नोंदी करुन रुपये ९४,६४,५५,०००/- रकमेचा अधिकारी व स्वयंसेवी संस्थांनी संगनमत करुन भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार योजनेतील अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी दोषी आढळून आलेल्या अधिकारी व स्वयंसेवी संस्थांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही,

सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या दिनांक १५/१०/२०२४ च्या शासन निर्णयामध्ये अशासकीय संस्था निवडीचे निकष नमूद करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयात नमूद निकषांच्या आधारे जिल्हास्तरीय समितीने अशासकीय संस्थांची निवड केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक १५/१०/२०२४ च्या शासन निर्णयात नमुद निकषांप्रमाणे अशासकीय संस्थांची निवड करण्यात आली आहे, अशासकीय संस्थानी सादर केलेल्या देयकांमधून शासन नियमांनुसार जी.एस.टी. व विमा तसेच इतर रक्कम कपात करुन अशासकीय संस्थाना देय अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

क्षेत्रिय स्तरावर संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांची छानननी केली असता, मंगळवेढा तालुक्यातील एकाच व्यक्तीच्या चार संस्था असल्याचे आढळून आले नाही.

(४) हे खरे नाही.

जलसाठ्यांमधील उपलब्ध गाळ काढण्यासाठीचे सादर केलेल्या अंदाजपत्रकांना जिल्हास्तरीय समितीमार्फत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अद्यापपावेतो १४७ कामे करण्यात आली असून, त्यासाठी अशासकीय संस्थांना रुपये ३३८६.१२ लक्ष व शेतकऱ्यांना रुपये २१९७.९५ लक्ष इतके अनुदान असे एकूण रुपये ५५८३.६९ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अद्यापपर्यंत रुपये ९४,६४,५५,०००/- इतक्या रकमेची कामे झालेली नाहीत. अभिनव भारत समाजसेवा मंडळ, सालसे, तालुका करमाळा या अशासकीय संस्थेमार्फत १० जलसाठ्यांमधून प्रत्यक्षात ६,९३,८६३.६९ लक्ष घ.मी. गाळ काढण्यात आला असून, रुपये १,८१,३९,४३०/- इतका निधी संस्थेस व रुपये ९९,२४,००६/- इतका निधी शेतकऱ्यांना असे एकूण रुपये २,८०,६३,४३६/- निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात 'पीएम राहत' योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत

**(५१) * ९३०९ श्री.कृपाल तुमाने, श्री.किशोर दराडे, श्रीमती भावना गवळी, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकीय उपचार मिळावेत या उद्देशाने "पीएम-राहत" योजना राबविण्यात येत असून सदर योजनेत प्रति रुग्ण दीड लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातानंतरच्या 'गोल्डन अवर' मध्ये उपचार सुनिश्चित करण्यासाठी या योजनेतंर्गत २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना कमाल ७ दिवसांपर्यंत विनामूल्य उपचार देण्याची तरतूद करण्यात आली असून सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी सर्व शासकीय तसेच खाजगी (नियुक्त व अनियुक्त) रुग्णालयांमध्ये नियमानुसार होत नसल्याबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघातग्रस्तांना त्वरित व विनामूल्य उपचार मिळावेत यासाठी या योजनेची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर योजना भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली असून राज्यामध्ये सदर योजनेची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरावर आयुक्त, परिवहन यांचा अध्यक्षेखाली "राज्य रस्ते सुरक्षा परिषद" कार्यरत आहे. तसेच, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा रस्ते सुरक्षा समिती ही यंत्रणा कार्यरत आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी Public Financial Management System (PFMS) वर महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांची नोंदणी करण्यात आली आहे

सदर योजनेंतर्गत गंभीर रूग्णांना सुरुवातीचे ४८ तास आणि इतर रूग्णांना २४ तास प्राथमिक जीवनावश्यक स्थिरीकरण उपचार (Stabilization Treatment) देणे सर्व संबंधित रूग्णालयांना बंधनकारक आहे.

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योजनेंतर्गत रूग्णालयांचे जाळे वाढविणे, तक्रार निवारण व्यवस्था सक्षम करणे तसेच नियमित पर्यवेक्षणाची कार्यवाही आयुक्त, परिवहन यांच्यामार्फत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत असल्याबाबत

**(५२) * ९५९४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील ऐरोली ते शिरवणे येथील (TTC कॉरिडॉर) ३३८ एकर जमिनीवर अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास खाजगी विकासकामार्फत करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे बेलापूर पट्ट्यातील दिघा ते शिरवणे येथे तीन विभागात होणारा हा प्रकल्प धारावी पुनर्विकासाखालोखाल सर्वात मोठा प्रकल्प ठरण्याची शक्यता असून सदर प्रकल्प राबवत असताना औद्योगिक विकास महामंडळाने शासनाची, वन विभागाची व गृहनिर्माण विभागाची पूर्वपरवानगी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुनर्विकास प्रकल्प राबविताना औद्योगिक विकास महामंडळाने सदर जमिनिवर उद्योग न उभारता झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) राबवण्यासाठी निविदा काढल्याने हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच यास जबाबदार असणाऱ्यांवर शासन कारवाई करणार काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) म.औ.वि. महामंडळाने टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठीच्या प्रकल्पाच्या कामाच्या तीन "प्रस्तावाची मागणी (RFP)" निविदा सूचना क्र. ८९/२०२५-२०२६ अन्वये दिनांक २७ /०३/ २०२६ रोजी मागविल्या होत्या.

(२) व (३) हे खरे नाही.

टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्ट्यांसाठी पुनर्वसन प्रकल्प राबवून मोकळी होणारी जमीन औद्योगिक वापरासाठी उपयोगात आणणे प्रस्तावित होते.

तथापि, महाराष्ट्र शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ अ चे पोटकलमे (१) व (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० अन्वये मुंबई महानगरप्रदेश क्षेत्रातील (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून) ८ महानगरपालिका व ७ नगरपरिषदांकरीता "मुंबई महानगरप्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण" हे स्वतंत्र प्राधिकरण स्थापन केले आहे. वरील प्रमाणे ८ महानगरपालिका व ७ नगरपरिषदांच्या क्षेत्रातील सर्व धारणाधिकार व मालकी हक्काच्या जमिनी (केंद्र शासनाच्या जमिनी वगळून) झोपडपट्टी क्षेत्र मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रात येते. त्यामध्ये टिटिसी औद्योगिक क्षेत्रांसह नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे.

त्यानुसार म.औ.वि. महामंडळाने मागविलेल्या "प्रस्तावाची मागणी (RFP)" मध्ये सदर पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागांची पूर्व परवानगी घेण्याची अट अंतर्भुत केली होती.

(४) नवी मुंबई झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी म.औ.वि. महामंडळाकडून काढण्यात आलेली ई-निविदा सूचना क्र. ८९/२०२५-२०२६ (मुंबई) रद्द करून सदर प्राधिकार नवी मुंबई महानगरपालिकेस देण्याबाबतचे श्रीमती सुजाता सुरज पाटील, महापौर नवी मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ०१/०४/२०२६ रोजीचे निवेदन जोडून मा.मंत्री, वने यांनी दिनांक ०१/०४/२०२६ च्या पत्रानुसार निवेदनातील मागणीच्या पुर्ततेबाबत कार्यवाही होण्यासाठी संबंधीतांना आदेश द्यावेत अशी विनंती मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती.

(५) प्रस्तुत प्रकरणी शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार प्रशासकीय कारणास्तव म.औ.वि. महामंडळाने मागविलेल्या तिनही "प्रस्तावाची मागणी (RFP)" ई-निविदा सूचना क्र.८९/२०२५-२६ दिनांक १७/०४/२०२६ रोजी रद्द करण्यात आलेल्या आहेत. विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या रस्ते व पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(५३)** * **८७६७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागासह जिल्हा परिषद प्रशासनाकडे असलेल्या २७०० कि.मी. रस्त्यांची दुरवस्था झाली असून या भागातील जवळपास १५०० पुलांचे नुकसान झाल्याची घटना घडल्याने याबाबतची पाहणी केंद्रीय पथकांनी माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये केली असता त्यानुसार रस्त्यांच्या व पुलांच्या दुरुस्तीची कामे करणेसाठी विभागाने रुपये २,४३२ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अद्याप कोणतीही प्रशासकीय कार्यवाही झाली नसल्याने मराठवाडा विभागातील रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती होत नसून नागरिकांना दळणवळणाच्या अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर प्रस्तावावर कार्यवाही करुन मराठवाडा विभागातील रस्ते व पूल दुरस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) सन २०२५ मध्ये अतिवृष्टी व पूरामुळे मराठवाडा विभागातील जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ५३२३.४६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे व १५१९ पुलांचे नुकसान झाले असून त्यांच्या दुरुस्तीकरीता रुपये २०५१.६४ कोटी रकमेचा प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागास पाठविण्यात आला आहे.

मदत व पुनर्वसन विभागाने क्षेत्रनिहाय आपत्ती प्रश्चात गरज मुल्यांकन (PDNA) अहवाल तयार करुन केंद्र शासनास एप्रिल-२०२६ मध्ये सादर केला आहे.

केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर मदत व पुनर्वसन विभागामार्फत क्षेत्रनिहाय निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वडगाव पान, (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील ॲसिड हल्ल्यात जखमी शालेय विद्यार्थीनीला अर्थसहाय्य देऊन पुनर्वसन करण्याबाबत

**(५४)** * **९६०६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडगाव पान (ता.संगमनेर जि.अहिल्यानगर) येथील ग्रामीण भागातील एका शालेय मुलीवर शाळेतून घरी जात असताना एका अज्ञात व्यक्तिने ॲसिड हल्ला केल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक ठिकाणी शालेय विद्यार्थिनीवर झालेला हा हल्ला गंभीर स्वरूपाचा असून, सदर गुन्ह्याचा तपास प्रलंबित असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण घटनेची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी सामाजिक संस्थांच्या मदतीने जनजागृती करण्याकरीता तसेच सदर पिडीत मुलीला मनोधैर्य योजनेतून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी व तिला दर्जेदार वैद्यकीय उपचार व समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाणे येथील अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे. तसेच संगमनेर पोलीस स्टेशन यांच्याकडून गुन्हयाचा तपास सुरु आहे. पिडीत बालिकेला जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर यांच्यामार्फत “पीडित नुकसान भरपाई (Victim Compensation Scheme) या योजनेमधून रुपये ३ लक्ष इतके अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

सदर बालिकेचे जिल्हा बाल संरक्षण कक्ष अहिल्यानगर यांच्याकडून समुपदेशन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, (मेयो) नागपूर येथील नेत्र रोग विभागाच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(५५)** * **८६९३ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, (मेयो) नागपूर येथील नेत्ररोग विभाग हा मागील १०-१२ वर्षापासून कुटुंब कल्याण केंद्राच्या इमारतीत स्थलांतरीत करण्यात आला असून विभागाची नवीन इमारत बांधण्याच्या तांत्रिक पूर्ततेसाठी अस्तित्वातील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट

करण्यासाठी प्रशासनाने रुपये ४ लाख न भरल्यामुळे या इमारतीचे बांधकाम व डागडूजी अजूनही होऊ न शकल्यामुळे नेत्ररोग विभागात शेकडो रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेत्ररोग विभागाकडील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट फी भरून संबंधित इमारतीच्या बांधकामाचे व डागडूजीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे असल्यास सदर कार्यवाही किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही,

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, (मेयो) नागपूर येथे २०१६ पासून नेत्ररोग विभाग हा सर्जिकल कॉम्प्लेक्समध्ये स्थानांतरीत करण्यात आलेला असून तेथे ३ अद्यावत मॉडयुलर ओटी प्रशस्त जागेत तयार करण्यात आलेल्या आहेत. तेथे ४५ रुग्णांची सोय असलेले दोन प्रशस्त वार्ड क्र. ३८ व ४२ तयार करण्यात आलेले आहेत.

सदर सर्जिकल कॉम्प्लेक्सची इमारत व तेथील वार्ड सन २०१६ पासून सुरु झालेले आहेत.जुनी असलेली इमारत पाडून तेथे सर्जिकल कॉम्प्लेक्सची इमारत बांधण्यात आलेली आहे.

नेत्ररोग विभागात वर्षाला अंदाजे ३५०० मोतीबिंदु शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया मिळून एकूण अंदाजे ५००० शस्त्रक्रिया या विभागाअंतर्गत करण्यात येतात.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## बेलसर (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील वाडा ॲग्रो मशरुम कंपनीतील मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(५६) * ८७९९ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलसर (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील वाडा ॲग्रो मशरुम कंपनीत सांडपाण्याची (ड्रेनेज) बंद टाकी स्वच्छ करताना कामगारांना सुरक्षिततेची कोणतीही साधने (उदा. मास्क, गॅस डिटेक्टर) पुरवली नसल्याचे आणि बंद जागेत (Confined Space) काम करताना सुरक्षेचे नियम पाळले गेले नसल्याने येथील तीन कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनी व्यवस्थापनाने सुरक्षिततेची साधने न पुरवल्यामुळे ही दुर्घटना घडल्याने सदर कंपनीतील जबाबदार असणाऱ्या दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित व्यवस्थापनाने मृत्यूमुखी झालेल्या कुटुंबियांना कंपनी व शासनामार्फत आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच कामगारांच्या मृत्यूप्रकरणी दोषी असणाऱ्यां विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नागरिकांमार्फत कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(३) कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसदारांना कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई देण्याबाबत कामगार न्यायालय, पुणे यांच्यामार्फत कार्यवाही सुरू आहे.

कंपनीच्या व्यवस्थापनाविरोधात पोलीस स्टेशन, जेजूरी येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच कंपनी भागधारकांविरुध्द मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे यांच्याकडे खटले दाखल करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रयोगशाळा चाचण्यांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५७) * ९१९४ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बाह्ययंत्रणेमार्फत केल्या जाणाऱ्या प्रयोगशाळा चाचण्या बंद करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने नुकताच घेतला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक आरोग्य केंद्रात प्रयोगशाळा चाचण्यांसाठी स्वतंत्र रुम, आवश्यक साहित्य आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपलब्ध नसल्याने ‘इन-आऊट’ चाचण्यांसाठी डॉक्टरांच्या सूचनेवरुन रुग्णांना खाजगी लॅबमधून तपासण्या करण्याकरीता आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बाह्ययंत्रणेमार्फत केल्या जाणाऱ्या प्रयोगशाळा चाचण्या बंद करण्याचा निर्णयाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यातील गोरगरीब रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागू नये याकरीता तातडीने राज्यातील आरोग्य केंद्रात प्रयोगशाळा चाचण्यांसाठी आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा व प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) (२) व (३) केंद्र शासनाकडून आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध यंत्रणा बळकटीकरण करून प्रयोगशाळा चाचण्या सुरू करण्याचे निर्देश प्राप्त झाल्यामुळे तसेच केंद्रशासनाकडून कमी निधी प्राप्त होत असल्यामुळे राज्यातील फक्त प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्ययंत्रणेमार्फत दिल्या जाणाऱ्या प्रयोगशाळा चाचण्यांच्या सेवा बंद करून संस्थेत कार्यरत प्रयोगशाळा यांच्या माध्यमातून सेवा देणेबाबतचे आदेश आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजी देण्यात आले होते. तथापि, रुग्ण हिताच्या दृष्टीने सदर आदेश मागे घेऊन या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत सुरु करण्यात आल्या आहेत.

(४) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये बाह्य यंत्रणेमार्फत केल्या जाणाऱ्या प्रयोगशाळा चाचण्या पुर्ववत सुरू करण्यात आलेल्या असून प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळांच्या माध्यमातून प्रयोगशाळा सेवा बळकट करण्याकरीता आवश्यक उपकरणे व इतर साहित्य खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना प्रयोगशाळा चाचण्यांच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(५८) * १०६०२ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी पंचायत समिती (ता.आर्णी, जि.यवतमाळ) अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण (घरकुल) योजनेच्या अंमलबजावणीत लाभार्थ्यांना प्रत्यक्ष घराचे बांधकाम न करता किंवा अपूर्ण/अस्तित्वात नसलेल्या बांधकामांवर अनुदान वितरित करण्यात आल्याच्या तसेच एकाच घरासाठी अनेक लाभार्थ्यांना लाभ देण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात आर्णी पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमत करून मोठ्या प्रमाणात नियमबाह्य पध्दतीने घरकुल अनुदान वितरित केले असून लाभार्थ्यांकडून अनधिकृत आर्थिक वसुली झाल्याच्या तसेच "घर न बांधता अनुदान वितरण" या स्वरूपातील गंभीर गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारींच्या प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीअंती याप्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करणे, सेवेतून बडतर्फ करणे तसेच नियमबाह्य वितरित करण्यात आलेल्या घरकुल अनुदानाची वसुली करण्याबाबत तसेच भविष्यात अशा प्रकारचे घरकुल गैरव्यवहार होऊ नये यासाठी शासनाने कोणती सुधारणा व नियंत्रण उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) आर्णी पंचायत समिती, ता.आर्णी, जि.यवतमाळ येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतील मंजूर लाभार्थ्यांच्या घराची पडताळणी केली. त्यावेळी प्रत्यक्ष बांधकामाची पाहणी देखील करण्यात आली. लाभार्थ्यांना घराच्या प्रगतीनुसार अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच अपूर्ण किंवा अस्तित्वात नसलेल्या घरावर अनुदान वितरीत केल्याचे अथवा एका घरासाठी अनेक लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याचे आढळून आले नाही.

तसेच घरकुल योजनेत गैरव्यवहार होऊ नये या करीता सर्व गट विकास अधिकारी व तालुकास्तरीय यंत्रणेला घरकुल लाभार्थ्यांना वारंवार भेटी देणे व तपासणी करण्याबाबत जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेमार्फत सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**<br>**सचिव-३,**<br>**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.